आराधना

(कवितासंग्रह)

वामन नारायण देशपांडे

किंमत अडीच रुपये

व्हीनस प्रकाशन : पुणें

पहिली आवृत्ति १९३८
दुसरी आवृत्ति १९४७
तिसरी आवृत्ति १९५३
चवथी आवृत्ति १९५६

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार : पुणें २

मुद्रक :
चिं. ग. वझे
साधना प्रेस
३७४ शनिवार : पुणे २

अनुक्रमणिका



१. भारती – रूपकात्मक खंडकाव्य

जाति–समुदितमदना

१

नील नभातें नक्षत्रें जीं निज तेजें उजळितीं
एकाएकीं स्तिमित होउनी तीं कोणा पाहतीं ?
—अहा ! निशेच्या पदराखालीं भू-बाला घेउन
त्रिभुवन-जननी तिला पाजिते निर्मळ चंद्र-स्तन !
ज्योत्स्ना फुलवी सु-वर्णगिरिचें हरितपर्ण कानन
योग्याची जशि जीवकला करि परकाया चेतन !
ठायीं ठायीं डुलती तेथे सप्तपर्ण तरुवर
झोके घेती दोल्यावरती वनदेवी त्यांवर.
कंप चंपका सुटे, स्वेदही फुटला कलिकांमिषें
—नकळे त्याचे सात्त्विक भावहि जागृत झाले कसे ! १०
विक्षेप करुन शाखा-करिं, पदिं अहि-नूपुर बांधुन
नृत्य कराया सज्ज जाहले काय विटप चंदन !
कस्तुरीमृग मालतीलताकुंजामधि बैसुन
मोह पावतो निज दयितेच्या नाभीतें हुंगुन.
उडति काजवे तमालतरुच्या घनछायेभीतरी
भिल्लकिशोरी कुणी वाकुल्या काय दाखवी तरी !
त्याच वनीं हें भावसर स्मित तरंगरूपें करी,
अंक–हरी त्यामधे वल्हवी बिंबमया विधु-तरी.
जळीं टाकुनी पाय कोण ही बसली सौदामिनी ?
—ध्यानधारणा मुनिहि विसरतिल तिजला अवलोकुनी ! २०
वाल्मीकीच्या सुयशासम ती धवलांगी गोजिरी,
कोमलगात्री जयदेवाची जैशी वर्णावली,
कवि-कुल-गुरुच्या कल्पनेपरी चारु मदनमंजरी,
अलंकारमंडिता ज्यापरी प्रथिता ‘ कादंबरी ’.

क्षणीं गुणगुणे अस्फुट गाणें अपुल्याशीं रंगुनी
तन्मुखिं नेउन कान वदा तें समजुन घ्यावें कुणीं ?
क्षणिं मोत्यांची माळ कौतुकें कंठींची तोडिते
जलमत्स्यांतें कवळ तयांचे नवलपरी भरविते.
क्षणीं घेउनी गंधित कुमुदें भरभरुनी अंजली
कुमुदबांधवा भावें त्यांची अर्पी अर्घ्यावली. ३०
"या ग मुलींनो! चला"—म्हणुन ती बाहे उच्चस्वरीं,
लगबग येती नऊ बालिका परड्या घेउन करीं.
तिजभोंती त्या मंडळ धरुनी म्हणताती वंदुन :
"परोपरीचीं फुलें आणिलीं हीं आम्हीं वेचुन—
शय्या त्यांची रचूं, मग तुम्ही व्हा राधा विरहिणी,
तापद होतिल उपचारहि हे सकळ तुम्हांलागुनी!
कुंजवनच हें विपिन, गौळणी आम्ही स्मरविव्हला,
निज विरहाचें गीत आळवूं गळयांत मिळवुन गळा!"

२

इतुक्यामाजी सशब्द आला एक विशिख त्या स्थळीं
त्यामागुन ये भिल्ल—अनुसरे गदास यम ज्यापरी! ४०
परस्परांशीं कुजबुजती त्या छद्माने हासुन :
"गडे पहा हा अम्हांकारणें 'कृष्ण' च ये धावुन!"
सावधानता भिल्लाची त्या रूपद्युतिदर्शनीं
गालांवरच्या खळींत त्यांच्या पडे पाय घसरुनी!
"खैरच झाली"—वदे—"कुणाही मम शरें न विंधिलें
खचित सांगतों, चमरीगण मीं दुरुन तुम्हां मानिलें!
गवसे ना मज सावज तरिही खेद न हो मन्मनीं,
पुण्यच फळलें—मला आतुडे शृंगाराची खनी!
गौर मोहने! स्त्रीसभेंत या तूं मुखरण शोभशी
अप्सराच या दासी म्हणुनी काय सर्वे मिरविशी? ५०

कवणाची तूं कोण ?—कासया ऐशी रानींवनीं ?
तुला पाहुनी मोहुन गेलें मन माझें साजणी ! ”

३

भ्रुकुटी झाली वक्र जणू ती अलक तिचे चुंबिते
तुच्छतेप्रती दावुन देवी त्यालागी बोलते :
“ थोराची मी तनया, मजला म्हण तूं रे भारती
नऊ कुमारी सख्या माझिया रूपवती—गुणवती.
बघुनी गगनीं इंदुकला ही साधु-हृदय-निर्मला
केलि कराया त्यजुनी आलें प्रासादहि आपुला
कोठे मी, तूं कुठे ?—आपुली कैशी व्हावी तुला ?
निःशंक तुला केवि पाहवे नजर भिडवुनी मला ? ६०
सिकतेवरिही जेथे माझें पदपंकज उमटतें,
वसंतलक्ष्मी स्वयें प्रगटुनी त्या स्थानीं लोळते !
—क्षुद्र कुरबका हातहि माझा ओझरता लागतां
सर्वेचि त्या ये कल्पतरूचें रूपसाम्य तत्त्वता !
रसना माझी तालूलागी सहज जरी स्पर्शिली,
घुमूं लागते माधुर्याची एकसरें बासरी !
भुलले मजला अनंत मानव—विरक्तही सन्मती—
कृपावीक्षणहि मिळुन न माझें कुढती—कढती किती !
धीट असा तूं कोण—ठेविशी प्रीतिभाव मजवरी ?
—व्यतिपातातें सांग केधवा शुभद तिथी लाभली ? ” ७०

४

“ ऐक मानिनी ! नारीत्वाची असशी चाफेकळी,
शूर वीर मी— पुरुषगुणांची मजहि वाण कोठली ?
गणदास मला वदति—येथला मी स्वामी आगळा—
सांज—सकाळीं शत भिल्लांचे झडती मुजरे मला.

देखतांच मज मनीं दचकती भीषणही केसरी,
थोर थोर नृप साथ याचिती नित माझी संगरीं.
प्रसन्न चंडी मला : स्कंधिंचें रुधिर अर्पितों तिला
मांत्रिक मी—मज पिशाचगणही वश पुरता जाहला !
भिल्लकन्यका कैक मानसीं मजसाठी आतुर
योग्यच झालें, पुजिल्या नव्हत्या मीं गौरी त्यांतिल ! ८०
ऐकुन होतों गोड नाम तव मी केव्हापासुनी
आज साधली दैवें अपुल्या भेटीची पर्वणी.
मज वरमाला घालाया हीं काय फुलें आणिलीं ?
—उटजीं जाऊं चाल माझिया, हो माझी अंतुरी !
गणगोताची भीड जरी तूं बाळगिशी अंतरीं,
टिळाच त्यांच्या रक्ताचा तुज लाविन भाळावरी ! ”

५

गांभीर्य पळे, भारति-वदनीं स्मित वेगें धावलें
वृत्र मरुनिया जलौघ जैसे ते झाले मोकळे !
—“ सार्थच आहे नाम तुझें, तूं गमशी कज्जलगिरी
तमालदलरस काय चर्चिला अपुल्या देहावरी ? ९०
शेषशिखा तूं, द्यौपुरुषाची की मुखरोमावली ?
विश्ववैष्णवा काय घवघवित कृष्ण गंध तूं तरी ?
मुळची तुझिया अंगीं होती लावण्याची द्युती,
तुझीच छाया काय बिलगली की मोहुन तीप्रती ?
श्वेतवर्ण तव विलसत होता स्फटिक-पिंडिकेपरी,
काय त्यामधे भिल्लिण कोणी की बिंबित जाहली ?
त्रिखंडांत वद मिळेल ऐशी कवण तुला भामिनी—
विळखा जी तव कर-सर्पाचा साहिल तनुलागुनी ? ”

६

“ प्रियच मला निज रंग सावळा निखंदिशी तूं जरी,
माझी मजला सखये ! त्याची कळते महती पुरी : १००

वाजवितों मी मृदंग तेव्हा दिसतों मेघापरी
मजसन्मुख मग मुदें नाचते श्रमें मोरमंडळी.
धरुन कितेकां मान टाकितों त्यांची मुरगाळुन
–कुणीं करावी पारध त्यांची वनोवनीं हिंडुन ?
हिरव्या राइंत होतों निद्रित वैशाखीं एकदा
वैरी माझा रसरंग तिथे अवचित आला तदा;
सावध नच मी, सशस्त्र रिपुशीं झुंज कासया करी ?
कर उभारुनी अतिविंदानीं ठेलों वृक्षापरी !
'वीज पडुनिया तरु वठलेला'– ऐसें मज तो गणी
"दडला कोठे ?"–म्हणत परतला अधिक चिडुन तेथुनी ! ११०
सुहृदासम जो वर्ण साधितो हित माझं यापरी,
राहिल बनुनी गडे तुझी तो कायमची साउली !
प्रेमदेवता तूं माझी, मी प्रेमाचा पाइक
तडाग मी, तूं हंसी माझी हो नाजुक-साजुक.
मेघराज मी कभिन्नकाळा, धवल तूं बलाकिनी
भैरवमूर्ती मी, माझी हो उटीच तूं चंदनी.
घनश्याम मी–मला आवडे तुजऐशी गोमटी
चपलेसम तूं–तुला रुचेना कसा काजळी पती ?"

७

हसति बालिका, हसे भारती धरुन मुखीं अंचळ
म्हणे मनाशीं, "तर्कपंडितच हा अभिनव केवळ ! १२०
अनार्य आधी, अनंगरंगें त्यांतच जडलें पिसें
मर्कटचेष्टा काय करिल हा–मर्यादा ही नसे !
येथ पातलें खेळायातें खेळ मी नवेनवे,
काळें मेलें मांजर मजला हें आलें आडवें !
अल्प यामिनी उरे; शशांकहि कलला अस्ताचलीं
इथुन सुटाया प्रेमाचें मी मिष करितें तोंवरी !"

८

पळापळाला गणदास मनीं अधिरावत चालला
एक एक पद पुढती सरुनी तत्सन्निध ठाकला—
—" मौन भारती ! कशास धरिलें ?—बोल, बोल मजसवें
मिठी मार, ये, मजला आता आवेग न साहवे ! १३०
तूं सुंदर फुलझडी, घडण तव देहाची मोहन
काय बसविले तुझिया वदनीं हरिणीचे लोचन ?
कवळावशी घडिघडि वाटे तव शिरिंची नागिण—
चंदनशाखा गणुन बैसली जी तुजला बिलगुन !
ऊर तुझा का असा थरथरे ससा जसा कातर ?
—भय-लज्जेचें जाल मनांतिल हें आवर—सावर !
किती करावी तव मैतरणी ! मनधरणी याहुन ?
—परदारांतें खचित पळवितों आम्ही झड घालुन ! "

९

नटनागर ती रमणी त्यातें बळेंच मुरडुन पुसे :
" सांगा आधी मजशिं द्यायचें सौख्य कोणतें कसें ? " १४०
"—आवडती तूं नार लळ्याची माझी झाल्यावरी
तुझ्या सुखाला अंतपार वद राहिल कैसा तरी ?
गुंजमाळ मी तुला घालुनी गळा तुझा सजवुन
सर्पमण्यांचीं दिव्य कुंडलें झग झग झग देइन.
कानीं तुझिया आम्रमंजरी निज हातीं खोवुन
मोरपिसांनी विचित्र नटविन तुझें केशबंधन.
नवें मधाचें पोळें आणिन तुजसाठी प्रतिदिन,
शेज तुला मी रचिन राजसे ! व्याघ्रांबर पसरुन.
सफळच होइल रमणीपण तव मजसंगें नांदुन
वसशिल भुवनीं एकलीच तूं भाग्यवंत कामिन ! " १५०

१०

" तुजवरुनी हा जीव टाकितें मी तर ओवाळुनी,
कृष्णदेव तूं–तुझी जाहलें मी राणी रुक्मिणी !
कुरळ कुंतलीं तुझिया पदिंची धूळ पुसूं दे मला,
प्रेमाश्रूंतें ढाळुन नयनीं प्रक्षाळिन त्यांजला.
लज्जायुत मी–असतिल गालीं लोध्रसुमें उमलतीं–
वरमाळ तुला त्यांची वाटे घालावी संप्रती !
अवसेसम तूं असुनहि माझें चित्त जडे तुजवरी
–प्रियच नसे का कचकलाप हा आम्हां घनकाजळी ?
कंदर्पाची सायक–लक्ष्मी मजला गणिलें जरी,
म्हणतिल लोकीं मदन-धनूचा गुण तुजला त्यापरी ! " १६०

११

कोण मोद त्या ?–नुमगे त्यातें भारतिचें कैतव
करतल वाजवि, हर्षातिशयें विकट करी तांडव !
खुणाविते ती नेत्रकटाक्षीं सकळ बालिकांप्रती
आशय हेरुन तिचा, त्या त्वरें भिल्लातें वेढिती :
एक विखारी कटाक्ष अपुले फेकितसे त्यावरी,
दुजी धरितसे हात तयाचा शुंडादंडापरी,
तिजी मुरकते, चवथी वर्षी हास्यमधुच आपुला,
–नऊ जणींनी छळच तयाचा येणेंपरि मांडिला !
फेर धरुन मग तान छेडिती त्या मंजुळ मंजुळ
नाच नाचती पदन्यास निज करुन पवनचंचल ! १७०
त्या गानरवें बहरुन आले ' मेरु वृक्ष तेथले,
कर्णिकार-शिरिं नृत्यकलेने पुष्पमुकुट चढविले !
तरुही फुलले–भिल्लाची मग काय वदावी स्थिति ?
निपचित पडला, घडिभर झाला मृतच आपणाप्रती !
विश्वेश्वरिच्या दिव्य यामिनी-कबरी-भारांतुन
गुलाब गळला तोंच जयाला अरुण बोलती जन !

तसाच टाकुन गणदासातें देहभानविरहित
पळतच गेल्या गेहीं सगळ्या त्या हासत-खिद्ळत !
उघडी डोळे रविकिरणांचे भाले त्या स्पर्शितां,
शुद्धबुद्ध परि हरिली त्याची भारतिने तत्त्वता ! १८०
तेव्हापासुन पिशापरी तो गहन तुडवि निजपदीं
"भारति ! भारति !-" साद तयाची गिरिकुहरें घुमविती !

. . .

भारतीस-

जाति-पादाकुलक

भिल्लिण कोणी रंभा मानुन
सुखें कंठिलें असतें जीवन-
परि भिल्लातें तूं वंचियलें
-काचहि फुटली, रत्नहि गेलें !

यदृच्छावशें त्वां भेटावें,
गणदासानें वेडें व्हावें,
-काय असावा विधिघटनेचा
जीवितहेतू हाच तयाचा ? १९०

२. परिवर्तन

सुनीत; वृत्त-शार्दूलविक्रीडित

खेळे मन्मथमंजरी दिनभरी जी माझिया अंतरीं
-स्वप्नींही कुतुकें निशीं प्रगटुनी लीला मनोज्ञा करी-
तीतें मी वदलों, "सखे ! हृदय हें पायीं तुझ्या अर्पिलें !"
"त्याची पायघडी करीन !"-म्हणुनी ती त्यावरी उत्तरे !
-या शब्दें हृदिं शोक तीव्र जडला कैसा निराशाभयें ५
तूझा त्यामधिं नित्य वास मदना ! तूं जाणशी तें स्वयें;

आता तूंच करी ' अशोक ' सदयें कैसें तरी त्याजला
—केला जो रतिने विलाप दहनीं बा ! आण त्याची तुला !—
त्यातें दिव्य अशोकवृक्षमयता येणेंपरी लाभतां
होवो स्त्रीपदघात त्यावरि किती झाला जरी तत्त्वता ! १०

तेणें तो बहरेल, तींच विशिखीं गुंफोनि सारीं फुलें
विंधोनी मग कोमला करि तिला संतप्त कामानलें !
आधी मद्हृदयासि जी अवगणी तें तत्पदीं अर्पितां,
आता वाहिल आपुलेंच मज ती पावोनि लोलंगता !

३. रजनी

जाति—चंद्रकांत

—: उत्तर कृष्णपक्षांतील एका रात्रीचें उत्प्रेक्षामय वर्णन :—

हळूहळू ये दिनामागुनी रजनी उदयाला
बघुनी तिजला बहर पातला काव्यकल्पनेला :

रात्र-कोकिळा अवकाशाच्या निज नीडामधला
वसुंधरेचा कोप आगळा ये उबवायाला !
लोह-खंड ही निशा, त्यापरी, दिवस गारगोटी ५
घर्षण होतां ग्रहगोलांच्या की ठिणग्या पडती !
रात्ररूप या पार्थिवलिंगा पूजितसे कोणी
धवल तारकाक्षता अर्पिल्या की त्यालागोनी !
आकाशाच्या शेतामाजी कणसें मोत्यांचीं
झटुन करितसे वृद्ध विधाता की राखण त्यांची— १०
बागुलबोवा उभारूनिया काळा रजनीचा
गोफणमारा जवें चालवी तुटल्या ताऱ्यांचा !
दिन-गौरांगा जटाजूट हा शोभे रात्रीचा
झुळझुळ वाहे ओघ त्यांतुनी की स्वर्गंगेचा !

भ्रमरीच दुजी गमे शर्वरी ही कभिन्नकाळी १५
स्वैर बागडे नरनारींच्या की लोचनकमलीं–
त्या कमलींचा मधु जागृतिचा आनंदें सेवी
निद्रा-जडता-दंश त्या स्थळीं ठेवुनिया जाई !

अज्ञाताच्या बिळांतुनी की ही नागिण आली
शशि-मणि काढुन शीर्षामधला विचरे मोदभरी ! २०
ज्योत्स्ना–गंगा येइ यामिनी–कालिंदीलागी
शशांकाचिया गंगोत्रींतुन भेटाया वेगीं !
निशा-गोपिका निघे घेउनी की शशि-कुंभ शिरीं
कपटी, काळा ' कृष्ण ' लपोनी हळुच खडा मारी–
दुग्ध सांडलें, घटालागुनी अंक-छिद्र पडलें २५
गौळण भिजुनी चिंब जाहली, अंग उजळ झालें !

शुभमंगल का तुझें व्हायचें वद रजनी ! बाई ?
किलबिलरूपें उडे ' द्विजां ' ची तरिच लगिनघाई !
नाकीं तुझिया दिव्य मोरणी चमके शुक्राची
हातपावली पदां उषेची आरुण रंगाची ! ३०
गगनदेविच्या लागुन कानीं पुसशी का तिजला :
" कैसा आहे वर्ण ति-क-ड-चा गोरा की काळा ? "
थांब घडिभरी, स्वयें तूंच घे पाहुन डोळ्यांनी
अरे, पोर ही भिवया उडवित बघ ! गेली उठुनी !

४. ढगाआडील चांदणी

जाति–' चांदणी '

हास चांदणी !

का घेशी निज वदनीं पदर ओढुनी ? ध्रु०

गगनिं तिमिर, भुवनिं तिमिर
विजनिं तिमिर, जनिंहि तिमिर
तिमिर मन्मनीं !
तुजविण ही कोण करी दूर जाचणी ? १

क्षणच तुझा उदय होत
क्षणच तुझी छवि झळकत
परि दुज्या क्षणीं
पदराने वदनातें घेशि झाकुनी ! २

तेज तुझें मम जीवन :
असुन नसे मी त्याविण !
शीण लोचनीं–
येइ गडे नभिं तुजला शोधशोधुनी ! ३

ज्योत्स्नेचा लाभ कुठुन
व्हावा तो मजलागुन ?
तुजशिं वेधुनी
चांदणीच पूर्णशशी मानिली मनीं ! ४

त्या तुझेहि हास्य-किरण
घन तिमिरीं मज मिळति न !
दीर्घ यामिनी
कंठुं काय तुजसाठी झुरत राहुनी ? ५

वाटतसे गगनिं उडुनि
प्यावें तव तेज नयनिं–
पदर सारुनी;
परि टाकी जडतेचा पाश जखडुनी ! ६

५. वेड ग खपुष्पाचें !

छंद– उद्धव

वेड ग खपुष्पाचें
जडलें हें कोठोनी ?
हासती मजलागी
अवघ्या शेजारिणी ! १

वेड ग खपुष्पाचें
धुंडिलें येथे–तेथे :
लागे ना खपुष्पाचा
कोठेंही माग मातें ! २

वेड ग खपुष्पाचें
सुजाण शेजारिणी
कागदी फुलानेंही
तयांची हो शिराणी ! ३

वेड ग खपुष्पाचें
खुळीला मला त्यांची
लाभे ही सुजाणता
जन्मांत तरी कैची ? ४

वेड ग खपुष्पाचें
जीवानें माझ्या बाई !
एकच खपुष्पाची
घेतली घोकणी ही ! ५

वेड ग खपुष्पाचें
अघ्रात त्याचा वास
नेतसे स्वप्नमयी
भूमीस मन्मनास ! ६

वेड ग खपुष्पाचें
धुंडिलें येथे-तेथे :
लागावा खपुष्पाचा
कोठोनी माग मातें ? ७

६. सोमरस

जाति-अचलगति

देवांच्या राज्यामधली
ही वल्ली भूवरि आली :
दिव्य तींतुनी
रस काढोनी
दुग्धयवादिक मेळवुनी
सोमासव करि सिद्ध ह्मणी ! १

त्यावरची पाहुनि कांती
भूल तुला पडली चित्तीं—
गमे उडूंचा
रस नवलाचा,
की रमणीनयनांमधलें
तेज त्यामधे कालविलें ! २

हविर्भाग इंद्राग्नींला
अजुनि न तूं यज्ञीं दिधला !
त्यावाचोनी
वद रसपानीं
आसक्ती धरिशी कैशी ?
—प्रतारणा ही देवांशीं ! ३

म्हणूं नको ऐसें कांही :
" रसबिंदुहि सेवित नाही ! "

वैतागोनी
रस न सेवुनी
सांग सांगता यज्ञाची
पुरती कैशी व्हायाची ? ४

लोलुपता धरिशील जरी
घटच सेविशिल सर्व तरी !
उन्मादाने
भरशिल तेणें
म्हणुनी देवांना त्यांचा
हविर्भाग अर्पायाचा ! ५

शेष उरे जें त्यांतून
करी तयाचें मित पान :
महति मिताची
अमित सदाची !
मित रस सेवुनि इंद्राला
वृत्रासुर वधितां आला ! ६

७. गाऊं कसें तरी ?

जाति–वैशाख (मात्रिक)

वद मायभूमि ! तूंतें गाऊं कसें तरी ?
तुज गीत गावयातें धजते न वैखरी ! ध्रु०

जेणें भरून रत्नें, मोत्येंहि आगळीं
द्याव्यात ओंजळीच्या तुज नित्य ओंजळी–
तो अंबुधीच आता परतंत्रता वरी
पृष्ठीं खुशाल वाही रिपुच्याहि रणतरी ! १

तव कूस धन्य केली किति वीरपुंगवीं–
एकाश्रुही तुझा त्यां रणरंगिं रंगवी !

गत काय पुत्रकांची तव आजला परी ?
—अंगार ठेविताती निज मंदिरावरी ! २

ही सृष्टि सर्व व्हाया बटकी तुझी सदा,
साऱ्या तुझ्या सुतांही सेवावया पदा—
आता हवा प्रतापी शाहीर फाकडा
गार्नी तुझेंच करि जो अवघ्या जडाऽजडा ! ३

एकेक शब्द त्याचा हो वज्र वैरियां
जेते म्हणून नुरती लोकीं पहावया !
दुबळ्या गिरेस माझ्या थोरी न ही परी
—मग मायभूमि ! तूंतें गाऊं कसें तरी ? ४

८. कपटवेष—एक अंकी नाट्यकाव्य

छंद—चंद्रकांत

पात्रें

गौतमबुद्ध	बौद्धधर्मसंस्थापक
उदयन	वत्सदेशाचा राजा
विभावरी	उदयनाची पट्टराणी
उषा, संध्या	विभावरीच्या सख्या
मार	बौद्ध वाङ्मयांतील 'पाप-देव'
तृष्णा, रति, अरति	माराच्या मुली

शिवाय उदयनाच्या इतर सात राण्या.

अंक पहिला

स्थळ :— कौशांबी नगरींतील राजमंदिर.

वेळ :— शुक्लाष्टमीची पूर्वरात्र.

(राजमंदिरांतलें शृंगारलेलें पूजागृह. पूजागृहास एकच प्रवेशद्वार आहे. आंत ठिकठिकाणीं रत्नदीप ठेवलेले आहेत. मध्यभागीं सुवर्णासनावर गौतमबुद्ध अधिष्ठित झाला असून त्याच्या दोहों बाजूंनी सुवर्णाच्या दोन समया तेवत आहेत. गौतमाच्या मागल्या बाजूची भिंत जाळीदार आहे व त्या जाळाशीं कांहीं आकृति मधूनमधून डोकावतांना दिसतात. गौतमासमोर एक 'रमणी' बसली आहे. रमणीच्या डाव्या हाताकडे पूजासाहित्य मांडलेलें असून जवळच तिच्या दोन सख्या उभ्या आहेत. रमणीने गौतमाची पूजा नुकतीच आटोपली आहे.)

रमणी : उषे, ठेव आवरून पूजासाहित्य;
—झाली बाई ! यथासांग पूजा अवघी !
संध्ये, सार वाती जरा समईंतल्या—

संध्या : निकें, महाराज—

रमणी : वेडे, वोसणिशी का ?
महाराज गे मी आहें की महादेवी ? ५

संध्या : महादेवीच आपण; बरळलें मी !
(उषा व संध्या सांगितल्याप्रमाणें करतात.)

रमणी : बुद्धदेवा ! आज किती हर्ष मन्मनीं !
आपण येऊन येथें घेतली पूजा !
राजमंदिरा आपुलें चित्त विटलें,
द्विवचनातें उबगे जैसें प्राकृत ! १०
प्रिय आपणा निवास रानीं-स्मशानीं,
पर्णकुटिकाच वाटे इंद्रभवन !
कौशांबींत आगमन होतांच काल
घोषितारामीं आपुला होई मुक्काम.
कालिंदीतटाकींचें तें स्थान निर्जन १५
मनोज्ञच आपणातें नंदनाहून !

परी आज उपोसथ-दिन पवित्र,
करावा वाटला रात्रीं धर्मजागर–
म्हणूनच येवोनिया पुण्यदर्शना
" निशीं भूपभवनीं या घ्यावया सेवा ! " २०
–ऐशी प्रार्थना मीं केली आपुल्या पदीं
आणि, आपणाही हो ती विनती मान्य.
धन्य दिवस हा ! धन्य, धन्य हो मीही !
बुद्धपादसेवा आज मज घडली !

गौतम : (हसून) विभावरी, यज्ञकुंडीं जैसे वैदिक २५
निर्दयपणें आहुती देती मेषाची,
तैसा तुवां अदयत्वें निज आग्रहें
माझ्या निश्चयाचा आज घेतला बळी !
आम्ही मुंडक–आम्हाला राजगृहाचा
नसता संपर्क आता हवा कासया ? ३०
कपिलवस्तू सोडिलें तेव्हापासून
राजवाड्याची मी नेघें कधी साउली.
विषय तो मूर्त; करी पुण्याचा क्षय,
–हेमंत घटवी जैसें दिनमानातें !
तशांतच उदयन—येथला स्वामी— ३५
माझ्या आगमनाआधी जाई मृगये;
निर्गमन होतां क्षणीं सिद्धियोगाचें
व्यतिपाताने लगेच व्हावें प्रगट,
–काय तैसा वागूं मीही ?—

रमणी : तिथीने स्वयं
व्यतिपाताशींच जरी निमंत्रियलें, ४०
तरी का न प्रगटावें, वदा, तयाने ?
आणि, काय नव्हेच मी येथली कुणी ?

आर्यपुत्राभावीं त्याच्या पट्टराणीची
राजगृहीं चालायची न काय सत्ता ?
मीं तयाच्या अपरोक्ष आपणालागी ४५
सहेतुक पाचारिलें–

(हें ऐकल्यावर उषा व संध्या यांना हसें न आवरून त्या खुदकन् हसतात !)

गौतम : का या हासती ?–
केव्हाचा मी बघतसें या बाला दोन्ही
एकमेकां खुणाविती !

रमणी : छे, तें उगीच !
काय झालें गे सारखें तुम्हां हासाया ?
जा, जा, आणि दाराचिया दोन्ही पापण्या ५०
मिटवा हळूच–

(उषा व संध्या जाऊं लागतात.)

अगे, थांबा क्षणैक !

(असें म्हणून ती रमणी स्वतः उठून दाराकडे जाते व त्या दोघींच्या कानांशीं कुजबुजते.)

उषे, संध्ये, येणेंपरी वर्तून तुम्हां
काय होता करायचा गोपनस्फोट ?
तुम्ही जा, हें उपस्थान तुमचें येथ
अडगळीसारखेंच होई मजशीं ! ५५
महादेवीसांगातीं त्या जाळीच्या आड
बघा अवघ्या महिषी आल्या न आल्या.
सांगा अवलंबावया स्तब्धता तयां,
आणि, यज्ञशाळेंतही जा डोकावून.

(उषा व संध्या प्रणाम करून जातात आणि जातांना प्रवेशद्वार बाहेरून लोटून घेतात.)

(स्वगत) कैसें साधे सोंग हें ?–ये मजही हसू ! ६०
कळीच्या पाकळ्या बळें सारून दूर
गंध प्रकटे बाहेर तदंतरींचा,
–तैसें सुटून माझिया ओष्ठांमधून
प्रस्फुट ही व्हाया पाहे हास्यलहरी !

गौतम : विभावरी ! 'सहेतुक पाचारिलें' तूं ६५
उद्गारून एकाएकीं का थांबलीस ?
कैचा हेत तो ?–काय हें गौडबंगाल ?
सांग सारें !

रमणी : अहो, वेड का पांघरितां ?
काय चतुरा ! आपणां नुमगे हेंही ?
का अवघें वदवितां माझ्याच मुखें ? ७०
काय कपिलवस्तूंत अंगनेसंगें
शृंगाररसतरंगीं नच रंगलां ?
काय तिने न दाविले आपुले भाव ?
–काय आपणां कधीही कळले न ते ?
काय माझी या वेळची ही वेषभूषा ७५
कांहीही आपणालागीं नच सुचवी ?
काय रत्नभूषणांची वाण पडली–
म्हणून हे मृणालांचे ललाम ल्यालें ?
चोरीला ताटकें गेलीं माझीं, म्हणून–
श्रवणीं केतकीपत्रें मीं का ठेविलीं ? ८०
काय काश्मीरांत आता न हो केशर ?–
कस्तूरीमृग निमाले का भूवरीचे ?–
म्हणून काय मीं निज देहीं चर्चिली
ही कर्पूर-चंदनाची नुसती उटी ?
अजूनही हे चुगल शीतोपचार ८५
रहस्य न कथिती का आपणां माझें ?

गौतम : शिव, शिव ! ऐकिलें हें काय भलतें !
वंचित नाहींत ना हे मत्कर्ण मज ?
मंगल जागर काय हाच गे तुझा ?
धर्मजिज्ञासा हीच का तुझी म्हणावी ? ९०
तुजपाशीं ठेव तव पातिव्रत्याची
निश्चिन्त मनें ठेवून जाई नृवर;
निज मोलागळी ठेव न निक्षेपिशी,
' न्या हो ही ! ' -उलट ऐसें अन्यां म्हणशी !
काय म्हणावें यातें ?—
रमणी : —हें प्रेमनैराश्य !— ९५
याहून त्या कटुतर न लावा शब्द !
कसलें तें पातिव्रत्य ?—कसला ठेवा ?
—मनाचीच खरोखर ही सारी माया !
बुद्धदेवा ! स्मरतो का, वदा, आपणां
मागन्दिय ब्राह्मण तो कुरुदेशींचा ? १००
हेमवर्णा तत्सुतेच्या तनु-चषकीं
फेसाळ यौवन-मद्य निसर्ग ओती !
रम्य दर्शनीं आपुल्या लागे बोलाया
तियेचा हृदय-क्रौंच प्रेम-मध्यम !
तीतें वराया आपणां तत्पिता याची, १०५
ते वेळीं आपण होतां जाहला ' बुद्ध ' !!
त्यायोगें तें जुळलें न,—नाठवे काय ?
गौतम : हो—हो. स्मरे आता.
रमणी : मीच ती मागन्दिया !
गौतम : तीच तूं ?—
रमणी : अजून न का पटे ओळख ?
का हो बघतां मजशीं ऐसें रोखून ? ११०
चकित-थकित होतां का हो यापरी ?

काय वाटे स्वप्नच हें जागेपणींचें ?

गौतम : नवलच जरी तीच तूं द्विजसुता !
सान इवली ती, थोर तिजहून तूं–
स्वातीएवढें जाहलें आर्द्रा नक्षत्र! ११५
कोमल ती किती, राठ तूं अळुमाळ,
की चिनारपर्ण झालें आम्रपर्णच !
म्हणूं कैशी तीच तूं ?–

रमणी : –हें फोल तर्कट !–
तरुणी दिसावी कैशी बालिकेवाणी ?
गरगरीत, तेजाळ पूर्णशशीतें– १२०
बीजेच्या तो कोरीपरी न दिसतसे
म्हणून का कधीं कुणी हिणवितात ?
–परिणति ही म्हणावी किंवा विकृती ?

(इतक्यांत जाळीदार भिंतीकडून अस्फुट हास्यध्वनि ऐकूं येतो.)

गौतम : हास्य-मौक्तिक-चूर्ण हे उधळी कोण ?
–हास्यरसातें जो तो का चढवी गोडी ? १२५
सल्या मघाशीं हासल्या, हें हासे कोणी,
–काय या राजभवना हो हर्षवायू ?

रमणी : असतील कुणी तरी दासी-बटकी
थट्टा-विनोद करीत होतां उसंत;
मनश्चंदनाची, सांगा आधी, आपुल्या १३०
संशय-भुजंगमाची मिठी सुटे की ?
आपणां भुलली मीच ना ती कन्यका ?

गौतम : आणि, कैशी राज्ञी होशी ?

रमणी : –मौजच तीही !–
म्हणती : पुरुषभाग्य अगम्य सुरां;
–स्त्रीभाग्यही काय तैसें नाही म्हणावें ? १३५

द्विजस्त्री होऊन जिने द्विजासहित
अग्निहोत्र पाळायचें, तीच सनृप-
करी अश्वमेध अंतीं दिग्विजयाच्या !
-भाग्यगुणच हा माझा न म्हणूं काय ?
विरक्त होऊन तात हो वनवासी, १४०
पितृव्य दे मजलागी उदयनातें.
दरिद्रसुता तरी मी लावण्यलक्ष्मी,
सहजच वत्सराज मज स्वीकरी.
काम साथी माझा—तोच मजकारणें
घालीतसे वीरासन मम हृदयीं : १४५
तेथून मन्नयनांच्या गवाक्षांतून
उदयनावरती तो शर मोकली !
-भूप मज पट्टराणी करी तात्काळ :
लौकिकांत तरी झालें यापरी त्याची !
दिलें पत्नीत्व त्या !-द्यावी प्रीतीही कैशी ? १५०
तेजापरी ऊबही का दे हिरकणी ?
प्रभो ! माझ्या हृन्मंदिरीं रायाऐवजीं
आपुलीच होऊं लागे मानसपूजा !
प्रेमपुष्प आपुलिया मूर्तीतें लाधे :
निर्माल्यही उदयना न मिळे त्याचें ! ! १५५
अन्य रीतीने घडाया आपुलें ध्यान
नृपें वरजलें तरी मी झालें बौद्ध !
मोक्ष-गुरु म्हणून न, परी आपुली—
प्रियकर म्हणूनच मूर्ती ये मनीं !
एकावरी मन वोळे, दुज्याची तनू, १६०
केवी ध्वजा मिरवावी पातिव्रत्याची ?
आपणावरीचें माझें तेव्हापासून
पूर्वीचें तें शुद्ध प्रेम जाहलें दग्ध !

हृदयाच्या ओसाडींत वसे संप्रती
करपल्या त्या प्रीतीचें पिशाच्च मात्र ! १६५
का न मग वासना ही व्हावी मजशीं
एकांतांत भेटायची आपणालागी ?
' बुद्ध नगरीं आले '-हें निवेदावया
यौगंधरायणें दूत वनीं धाडिला.
उषःकालीं उदयन उद्या येईल : १७०
—चला, घेऊं पुरवून त्या आधी हौस !
न यावा तो आला योग हा अवचित,
किती पाहतां सखया ! अंत दासीचा ?

(पुन्हा त्या जाळीदार भिंतीकडून दाबून टाकण्याचा प्रयत्न केलेला हास्यध्वनि होतो ! पण गौतमाचें तिकडे लक्ष्य नसतें.)

गौतम : (स्वगत) अहा ! काय संकट हें ओढवे तरी !
कोणत्या उपायीं त्याची फेडावी गोवी ? १७५
शंकाही या अरिष्टाची येती मजला,
तरी मी या पापपंकीं येतों कासया ?
हिजसाठी मीं लंघिला निज निश्चय,
आणि, हीच लोटूं पाहे मज रौरवीं !

(तो ध्यानस्थ बसतो. त्याने डोळे मिटलेले पाहून ती रमणी त्या जाळीदार भिंतीकडे पाहत हाताने स्तब्ध राहण्याची खूण करिते. तोंच मार हा तृष्णा, रति व अरति यांच्यासह लगबगीने प्रवेश करून गौतमाला घेरतो. माराच्या हातांत धनुष्य व पाठीशीं बाणांचा भाता आहे. हीं चौघेंहि त्या रमणीला अदृश्य आहेत.)

मार :

जाति–वरमंगला

वाजवा दुंदुभी ! पुष्पवृष्टी करा ! १८०
बुद्ध अपुल्या करीं आज आला पुरा ! ध्रु०

माझिया तूणिरीं कामिनी-नयन-शर
माखिलें त्यांप्रती घोर हालाहल !
कन्यकांनो ! तुम्हां त्याच शरिं योजुनी
विंधिताहें तर्यी गौतमालागुनी ! १८५
हृदयिं विशिखांसवें खोल रुतुनी बसा :
—ध्या क्षणीं मोहुनी त्याचिया मानसा !
पुण्य त्याचें हरुन बुद्धपण लोपवा,
देवशत्रूंमधे मेळवा वाहवा !
नरकपुररक्षका ! द्वार दे उघडुनी, १९०
—येत गौतम तुझ्या नरकपुरिलागुनी !

तृष्णा, रति व अरति सर्व मिळून :
छंद-पादाकुलक, अंत्य चरण वगळून.

गौतमाच्या मनःकोषीं
शरें शिरूं या निमिषीं
हरूं त्याच्या बुद्धत्वाला,
चला ग चला ! १९५

तृष्णा :

भोग-मृगजळामागें
पळवीन अनुरागें
त्याच्या चित्तकुरंगाला,
चला ग चला!

रति :

विषयाचें मधुपान २००
निशिदिन घडवीन
त्याच्या मनोभ्रमराला,
चला ग चला!

अरति :

हरीन मी त्याची शांती
बुद्धत्वेंच जिची प्राप्ती : २०५
मुकेल तो बुद्धत्वाला,
चला ग चला !

(नंतर मार स्पर्शमात्रेंकरून तिघींची बाणांवर योजना करतो व ते गौतमावर सोडतो; पण सर्व बाण निष्फळ ठरतात !)

मार :

जाति—हरिभगिनी

सहवे न पराभव हा मजला ! ध्रु०

नवलच मजवर—मात करी नर—शलभ जिंकितो गरुडाला !
दुःसह शर मम—ठरले सुमसम—अग्निकणच हिमकण झाला ! २१०
त्यजी न गौतम-लवही शमदम—कोण भुवनिं चळविल त्याला?
तरुपर्णांनी-फडफड करुनी-अचल कधी का डळमळला ?
पळा, पळा तरि—इथुनी सत्वरि—ना तरि हा शापिल सकलां !

(तीं सर्व घाईघाईने तेथून निघून जातात.)

रमणी : काय प्रिया ! एकाग्रता ऐशी साधून
कामसूत्रें आठवितां पूर्वी घोकलीं ? २१५
भुललां का रतिविद्या ?

गौतम : — देवी ! काय हें ? —
स्त्रीसहज लज्जा, काय, त्यजिशी सारी ?
गंगेने टाकाव्या चुळा जैशा मद्याच्या,
तैसें स्त्रीने उच्चारणें वाणी अभद्र !

स्त्रीशीं अनुचित ऐसे ऐकून बोल २२०
गमे बोले पुरुषच स्त्रीवेषधारी !
स्त्री वदेल ऐसें कैशी ?
(हें ऐकून आता स्वतः त्या रमणीलाहि अनावर हसूं लोटतें !)
काय, महिषी !
फवारे उडवितेस तूंही हास्याचे ?
काय मज वेडा–पिसा गणितां तुम्ही ?
–विदूषक स्वपतीचा मानिशी मातें ? २२५

रमणी : आपणच बोलायचें कांहीच्या बाही,
आणि, देतां दूषणही हासतां कुणी !
प्रेमनारायणा ! जैशी मी हासें–खेळें,
ताही तैशीच आहळी विरहाचीही !
राजगृहपुरी न का एकाच वेळीं २३०
न्हाते सरस्वतीपरी तपोदेंतही ?
परोपरीचे मी करीं शीतोपचार,
तरीही न व्यथा माझी लव हो कमी !
आपण व्हा धन्वंतरी–आपल्याविना
कोण ही आग शमवी अधररसीं ? २३५

गौतम : विभावरी ! का धरिशी ही कुवासना
उदयनाऐसा पति लाभून तुज ?
कीर्त ऐकिली तयाच्या रूपच्छवीची :
–अभिजित् ताराही वाटे तुच्छ त्यापुढे !
आणि, वीरही तो गाढा–चतुराग्रणी– २४०
शृंगारच शृंगाराचा–कलानिधीही–
कृष्णच त्या मानितातीं; कृष्णापरिस–
अष्टनायिकाही त्या–तूं त्यांत रुक्मिणी !–
का तूं सोडून वाळयातें त्या सुवासिक
आदरूं पहाशी तृण गंधविहीन ? २४५

पहा, जरा निरखून पहा मजला–
रूपलावण्याचा कुठे लागे का ठाव ?
विशोभित मोर जैसा पिसाऱ्यावीण,
दिसे त्यापरी हें माझें मुंडित शीर्ष !
ऊन-पावसांत तप मीं आचरिलें २५०
तेणें अंगकांती गेली झाकळूनिया !
तीव्र तपोवैशाखांत मदंतरींचा
अष्ट–रस–प्रवाहांचा खळखळाट—
सुकतांच प्रवाह, हो शांत सदाचा
आणि, शांतता केवळ हृदीं उरली ! २५५
येथून साहित्यवेत्ते गणोत पुढे
'शांत' नामक नव वा नववा रस !
एकल्या त्या शृंगाराची कथा ती काय,
रस आठही आळले जेथ यापरी ?

रमणी : प्रेम असे आंधळें–हें त्रिलोकीं ख्यात, २६०
कशाला मग हा गडे वृथा वादंग ?
कुरूप वा रूपवंत–रंक वा राव—
प्रीतीच्या राज्यांत सारे समसमान !
कुतनु कुबेरा वश अप्सरागण,
भणंग शिवातें वरी हिमनगजा ! २६५
आणि, खरेंच कथूं का जिवींचें गुज ?
–मत्प्रेम मजवरीच आपणाहून !
मत्सौंदर्यकला व्हावी विश्वमोहन,
हीच कांक्षा मन्मनांत ममत्वमूल !
–भुरभुरवून माझे नील कुंतल २७०
दर्शवी मारुत प्रेम मजवरीचें !
सूर्य-चंद्र हेही होती मोहसंमूढ :
मज कोमाळिती निज किरण-करीं !

जलसंचयीं मीं जरा डोकावतांच,
हृदीं साठवी मद्रूप तो बिंबरूपें! २७५
—अचेतनही जियेतें यापरी भुले,
सचेतनांचें कैवल्य केवीं हो न तीं ?
माझिया लावण्यजालीं नातुडलेले
धरातलीं आपणच आता एकले!
कैसें मजला सौंदर्य-सम्राज्ञीपद— २८०
लाभावें मीं आपणातें जिंकल्याविना ?
चला रतिमंदिरांत—

गौतम : का बधिरातें
वृथा गाऊन दाविशी रागरागिण्या ?
जैसा वाट चुकूनिया कुणी पथिक
घोर काननीं रहावा भ्रमत निशीं, २८५
आणि, तोंच अवचित तेजाचा झोत
दुरून तयाच्या यावा दृष्टिपथांत,
वाटावें निकटवर्ती खेड्यांतील तें
दीपकाचें तेज तया; आणि, हरिखें—
जावा तो त्या अनुरोधें त्या दिशेकडे २९०
परी जातां दीपापाशीं तया दिसावा
तेजःपुंज रत्नमणी दीपाऐवजीं !—
—कोण व्हावा त्या विस्मय आणि भयही !—
इतुक्यांत त्या रत्नाच्या दिव्य प्रकाशीं
आढळांत यावी त्याच्या कांहीशी दूर २९५
सरसरती लाटच कृष्णसर्पाची !—
—त्याच क्षणीं तो पळावा जीव घेऊन,
लवही न मोह होतां सर्पमण्याचा !—
—तैसाच मी होणार न तुजशीं लुब्ध !
जाऊं दे मजशीं—

रमणी : (अडवून) थांब, कुठे रे जाशी? ३००
मज दुखवून कैसा सुटशी जिता ?
खेळच मांडिला तुवां अग्निज्वालेशीं !
माझिया सौंदर्यश्रीची तुवां उद्धतें
अवगणना पुनश्च ही केली आहे !
शुकच तूं होशी; परी मज शुकाचें— ३०५
शुककाकाहून काय मोल अधिक ?
अवमानितां राज्ञीतें काय घडतें,
—तूंही राजकुमार—हें तूंतें ठाऊक !

(नंतर ती रमणी तीनदा टाळी वाजविते, त्याबरोबर त्या जाळीदार भिंतीचा चोर-दरवाजा धाडकन् उघडला जातो आणि त्या दरवाजांतून सर्वांग काळ्या वस्त्राने झाकलें आहे व हातांत नग्न तरवारी आहेत—अशा आठ व्यक्ति भराभर बाहेर पडतात.)

चला, वेढा या मुंडका—

(त्या व्यक्ति गौतमाला घेरतात.)

ऐक रे ऐक !
आता तरी मजलागी होई तूं वश— ३१०
ना: तरी ये मृत्यूचीच तुजला हाक !
तुझ्या मुखामधून ये जरी नकार,
तरी तीच तुझी तुज जाण वधाज्ञा !
पडतील तुजवरी खड्ग सर्वांचे,
उष्ण रक्ताचे फवारे उफाळतील ! ३१५
आणि, " बुद्धाची हरली शुद्धबुद्धच—
जेधवा त्या पूजेस्तव मीं निमंत्रिलें :
मज धरी भ्रष्टायची तो नीच मती ! "
—येणेंपरी मी लटकें कथीन भूपा !

गौतम : काय गे मुळी न तुज लज्जा-संकोच ३२०
अभित या अवध्यांच्या ऐसें वदाया ?
आळ कसलाही सुखें घे मजवरी :
क्षिति त्याची नाही—आहें जोंवरी पूत !
विवाहापरी मंगल मज निधन :
भीति मग मरणाची काय दाविशी ! ३२५
का मी मानूं खेद तव तीव्र शब्दांचा
—उल्केंतून अशनीच वर्षावयाचे !

रमणी : अभागीच श्रमणा ! तूं दिसशी पुरा :
भर तीन्ही सांजा येतां स्वगृहीं लक्ष्मी,
दीप तेवता दारून तूं मालवून— ३३०
का जाया लावशी तीतें मागल्या पदीं ?
झालें असतें शेजेची मी सांगातिण,
लुटला असता रस उभयतांहीं !
लपवूं आता कासया ?—तुझ्याचसाठी
उदयना ' निर्वाण ' मीं असतें दिलें ! ३३५
वत्सदेशची राज्यश्री हीच सवत
येती मज !–

गौतम : –विभावरी ! सार्थ त्वन्नाम !–
प्रत्यहीं घडती घोर निशीथकाळीं
व्यभिचार, तस्करत्व, नृशंस वध !
सामावले तव ठायीं हे सर्व दोष : ३४०
—खरीच तूं ' विभावरी ' मज दिसशी !

रमणी : पुरे, पुरे, जल्प किती मूढा ! करिशी ?
—मौज पहा ही उघडे ठेवून डोळे !
चल, माझ्या अष्टका ! तूं आता हो सिध्द–
वातावरणीं क्षणैक नाचवी शस्त्रें : ३४५

खड्गकोशच बनवी बुध्द-तनूचा,
—त्यांत निज असिलता विश्रमूं देई !

(त्या अवगुंठित आठ व्यक्ति आपापल्या तरवारी हवेंत उंच नाचवूं लागतात. गौतम वक्षःस्थळावर स्वस्तिक करून व मस्तक खाली लववून मरणास शांतपणें सिद्ध होतो ! त्या क्षणीं ती 'रमणी' त्याचे पाय धरिते !)

काय म्हणूं ?—किती वानूं ?—न पुरे वाणी !
अनंत जाहलें सान्त आपुल्या रूपें !
कटु वचनांची माझ्या करावी क्षमा; ३५०
आणि, आपणातें धृष्टें मीं वंचिलेंही !
मी न विभावरी; परि वेषांतरित
उदयनच मी !

गौतम : काय हा चमत्कार !—
तूंच काय उदयन कौशांबीपति ?
ऊठ, रे ऊठ !—

उदयन : आधी द्या मज अभय ! ३५५

गौतम : तुज सदाच अभय !

उदयन : आता ये धीर !

गौतम : विभावरी कोठे असे ?

(त्या अवगुंठित व्यक्तींपैकी एक व्यक्ति लगेच अवगुंठन झुगारून देऊन गौतमास प्रणाम करते.)

विभावरी : —ही मी वंदितें !

गौतम : भद्रे ! असो शुभ तव सदासर्वदा !
आणि, कोण हो हीं पात्रें अवगुंठित
कपटनाटकांतील तुम्हां दोघांच्या ? ३६०

उदयन : संसृति-वेणूचीं माझ्या बुद्धदेवा ! हीं
सप्त-सूर-स्थानें !

विभावरी : मी न का त्यांत कुणी ?

उद्यन : तूं न कशी कुणी ?–तूं गे वेणुमुखच !

(सर्व हसतात. मग त्या राण्या भराभर अवगुंठन टाकून प्रकट होतात व एकामागून एक गौतमास नमस्कार करितात.)

गौतम : प्रतिबिंबेंच या सर्व विभावरीचीं !
श्रुत होते राया ! तव गुण अनंत, ३६५
नटही तूं असशी–हें आज कळों ये !
भिन्नभिन्न गुणांचें तूं भांडार मूर्त !
–स्त्री–वेषींही शोभशी !–

उद्यन : –छे, मी उंच, राठ !–

(सर्व हसतात; गौतमहि हसतो.)

गौतम : आणि, कैतवकोविदा ! कासया केलें
भरतमुनी हो थक्क ऐसें हें नाट्य ? ३७०

उद्यन : आपण जाळून काम तपोहुताशीं
दुजा शिवावतारच झालां कलींत,
–याची बघायची होती मज सत्यता,
म्हणूनच आचरिलें आम्हीं हें छद्म !
ठावें आपणा : एकांतीं नव दंपती ३७५
पुसती–सांगती गुह्य परस्परांचें–
त्यापरी मीं गुजगोष्ट विभावरीतें
पुसतांच, ती निवेदी आपुलें वृत्त !
विभावरीऐशी दिव्य शृंगारखनी
अव्हेरिली आपण–हें अद्‌भुत अति ! ३८०
परी त्यांत एक मज भासे वैगुण्य :
याची तत्पिता आपणां; न स्वयं बाला !
लावण्यमंजरी स्वयें दावी हृद्गत,

तरी कोण नर तीतें न होई वश ?
मेनकेतें न प्रेषितां, स्वयं आपण ३८५
असतें याचिलें इंद्रें विश्वामित्रातें :
" ऋषे ! मेनकेतें तुवां अंगिकारावें–
' निकें ' म्हणतांच तूं मी धाडीन तीतें ! "
–तरी काय लोलंगता तदंतर्यामीं
उपजून तो ढळता तपापासून ? ३९०
म्हणून मी महिषीतें म्हणें विनोदें :
" देवी ! स्वयें तूं एकदा विनवी बुद्धा :
तरीच ये कस्तूरिका आणि मृत्तिका
निवडितां आपणातें ! "

गौतम : –ती काय वदे ?

उदयन : तिज तें न मानवलें; तीतें आपुल्या– ३९५
मनोनिग्रहाची पुरी होती कल्पना !
आणि, ती हो मनोमय शिष्या आपुली,
थट्टा जरी बहुसाल तिची मीं केली !
जैशी देवयानी कचा मोहून आधी
शेखीं पतिव्रता राणी हो ययातीची ४००
–तैशी विभावरी जरी भुले आपणां,
तरी अंतीं माझीच ती हो अंतर्बाह्य !
तिज कैसें रुचावें तें ?–ठाकलों मीच
पसराया मोहजाल कपटवेषें !
तिची सर न ये, तरी आपणच ना– ४०५
दिलें माझ्या या वेषाला प्रशस्तिपत्र ?

गौतम : आणि, खरेंच सकाळीं घोषितारामीं
स्त्रीवेषें येऊन केलें तूं पाचारण,

तेव्हाही ओळखू न ये तव कतव !
अजूनही दिसशी तूं स्त्रीच लोचनां ! ४१०

उदयन : यापरी योजिलें आम्ही आपुल्या चित्तीं,
अकस्मात योग आज आला जुळून.
आगमनाची आपुल्या वार्ता मजला
पष्ठीलाच जाणविली चारगणांहीं.
एकाएकी पट्टणीं मी उठवीं हूल : ४१५
" भूप मृगयेशीं गेला एकाकी रानीं ! "
राजवाड्यावीण कुणा सत्य ना ठावें,
–यौगंधरायणही तो भ्रमींच राही !
तेणेंच तो दूत धाडी विपिनीं मातें–
आपण आल्याची वार्ता कळवावया ! ! ४२०

(सर्व हसतात.)

गौतम : उषा-संध्या का हासत होत्या मघाशीं,
' महाराज ' ऐसें वाही संध्या का तूंतें,
आणि, जाळीआड कोण होतें हासत,
–मज आता आकळलें हें–

विभावरी : आर्यपुत्रा !
तुमच्या स्त्रीवेषें मातें पडलें कोडें : ४२५
नायक की नायिका या नाट्यांत तुम्ही ?

(सर्व हसतात.)

उदयन : सवतीमत्सर काय, देवी, वाटतो
माझ्याच स्त्रीवेषांतील रूपांतराचा ?

(पुनः सर्व हसतात.)

विभावरी : आणि, माझ्या अटी दोन्ही ?

गौतम : –वत्से ! कोणत्या ?

उद्यन : बुद्धदेवा ! आपण या येतां कसाला ४३०
सपत्नीक मीं बनावें बुध्दानुयायी,
आणि, घडवावी बुध्द-मूर्ति चंदनी,
—ऐसा संकेत ठरला तदा आमुचा !
—देवी ! वंशसंभव मी युधिष्ठिराचा !—

विभावरी : अहा ! नवस पुरले आज सकल ! ४३५
बुध्द आमुचा, आम्हीही झालों बुध्दाचे !
क्षमायाचना, भगवन्, करितसें मी :
—कष्टविले आपणांतें आम्ही मूढांहीं !
गायत्री-छंद हो सर्व छंदां तारक,
तैसेंच आपण आम्हां बालकां व्हावें ! ४४०

गौतम : धन्य उदयन ! धन्य विभावरीही !
विभावरीपरी नृपा ! बुध्दही तुवां—
केला आपुलासा; जैसें एकाच वेळीं-
बुध-रोहिणीचें करी विधु पिधान !
विभावरी ! मजही तूं क्षमाच करी :
कटु नेणून बोललों मी तुजविशीं !
कृष्णपक्षांतील न तूं घन शर्वरी,
परी तारा-किरीटिनी राकाच साच !

विभावरी : प्रभो ! काय आशीर्वाद आम्हां आपुला ?

गौतम : विश्वप्रेम हृत्कमलीं तुमच्या वसो : ४५०
पावो तेणें प्राणिजात सौख्य उदंड !

सर्व जण : तथास्तु ! !

उदयन : जा सभागृहीं तुम्ही अवघीं,
धारण करून येतों मी मन्नृवेष !
पहा ! मध्यरात्रीचा हा झडतो डंका,
—बघो प्रभात आपणां बौध्द झालेले ! ४५५

(डंका झडूं लागतो, जातात.)

९. चिवचिव

छंद-दिशा

भुलशी का आपुल्या लेकराला ?
चिवचिव नये का ऐकूं तुला ? भु०

" दाखवितें-" वदशी " जग तूंतें
  विटलाशी अंतरीं घरट्यातें ! "
-चंचूने तूं बाहेरी काढियेलें !
  शाखेवरी मजला ठेवियेलें !
आणि, जाशी सर्वेचि उडून तूं
  काय तुझा असावा यांत हेतू ?
ठावें तूंतें : नसती पंख मला
  केवि राहूं या स्थळीं मी एकला ? १०

बघ ! वाहे तुफानी कैसा वात
  गदगदा तरूतें डोलवीत !
डळमळे बैसलों ती डहाळी
  तोल माझा जाताहे वेळोवेळीं !
धुंद झाल्या धुळीने दिशा दाही
  दिसशी न कोठेही लोचनांहीं !
जाऊं कैसा कोटरीं पंखांवीण ?
  शाखेवरी रहाया धीरही न !
तातडीने आई गे ! येई येथ
  ने, ने मज सत्वरीं घरट्यांत ! २०

उबगशी काय तूं लेकराला ?
  चिवचिव नये का ऐकूं तुला ?

१०. माझिया जिवा !

छंद–नवगंध

भंगलेल्या कैचा कुंभांत
  जीवनाचा लेश उरावा ?
फेक कुंभ सोडुनी खंत
  माझिया जिवा ! १

टाका क्षीण धाग्यादोऱ्याचा
  जीर्ण पटीं केवि टिकावा ?
तोड बंध तोड हा त्याचा
  माझिया जिवा ! २

आसवांहीं मलूल फुला
  कोठला तो तजेला यावा ?
सुकूं देई सुखें रे त्याला
  माझिया जिवा ! ३

नव कुंभीं नव जीवन
  नव पटीं तंतु रे नवा
नव पुष्पीं गंध नवीन
  माझिया जिवा ! ४

११. आवाहन

छंद–शुद्धसती

१

मंदिर-देवते !
ये, ये मंदिरातें !

किती तुज बाहूं ?
किती वाट पाहूं ?
तुजकडे डोळे
सारखे लागले !

मंदिरीं पाऊल
वाजूं दे कोमल :
आतुर मी मनीं
ऐकाया तो ध्वनी !

२

मंदिर-देवते !
ये, ये मंदिरातें !

काव्यांत एकलें
फूल फुललेलें
आणिलें तोडून
शिणून-दमून :

परी कधी येशी ?
—फूल माझें घेशी ?
सुवासमिषें तें
निःश्वास सोडितें !

३

मंदिर–देवते !
ये, ये मंदिरातें !

वीणा लावियेली,
करांत घेतली,
—कैशी ती वाजवूं ?—
—कैसे भाव दावूं ?

गत ऐकावया,
भाव जाणावया,
नसशी तूं गडे!
वीणा खाली पडे!

४

मंदिर-देवते!
ये, ये मंदिरातें!

प्राणांच्या या ज्योती
धगधगताती :
तुज ओवाळीन,
आरती करीन!

नको लावूं वेळ,
ना तरी सकल
व्यर्थ जळतील,
व्यर्थ विझतील!

१२. अंगाई

छंद–उद्धव

कासया घोंघावून
स्फुंदशी रे पवना!
चहाळ लागतांच
दचके माझा तान्हा!

बाई गे बरसाती !
रडूनी धाई धाई
बाळाची माझ्या झोप
करिशी कडू काई ? २

जो जो रे लडिवाळा !
झोपेंत सुखें हास
माणिकमोतियांची
झडूं दे घरीं रास ! ३

नशिबीं थोरपणीं
अश्रूंचा पावसाळा,
बाल्यींच विलसूं दे
हास्याची चंद्रकला ! ४

हसशी जागेपणीं
तैसेंच झोपेंतही
हसवो रे तुजला
जिवती-माऊली ही ! ५

न रडे बरसाती !
स्फुंदी न रे पवना !
चहाळ लागतांच
दचके माझा तान्हा ! ६

१३. पूजिका

छंद–पूजिका

१

पूजापात्र हातीं घेवोनिया घाईघाई
देवमंदिराशीं आलें निशीथसमयीं.

दिगंतीं भरली होती काल-दीपांतली
दिवस-ज्योतीची तिमिराची ही काजळी !
नव्हता एकही दिवा नगरीं तेवत,
कोणाचीही पथीं मज नव्हती सोबत !
भयाण या वेळीं एकलीच मी निघालें,
मंदिरातें बाई ! देवदर्शना पातलें !

२

कशाचा मंदिरीं माजला हा कोलाहल ?
एकाएकी काय येई घडून नवल ? १०
अवेळींच का ही वाजे घंटा घणघण ?
का धावती लोक इकडून-तिकडून ?
चुडे पेटवून शोधिती ते कवणातें ?
"शोधा, मूर्ति शोधा !-" आरोळी का ऐशी उठे ?
पूजारी का दुःखें ऊर घेती बडवून ?
मंदिरावरी ये काय संकट दारुण ?

३

आजला देवाचा होता उत्सव मंदिरीं,
मूर्तीलागी साज चढविला परोपरी.
हिऱ्यामाणकांचा शोभे देवातें किरीट :
वाटे भूवरी ये नभ तारकखचित ! २०
यात्रा उत्सवाची भरे मंदिरापुढती—
एकच उसळे तदा यात्रिकांची दाटी !
त्यांतलेच कोणी आभूषणा विलोभती :
मध्यरात्रीं घाला मंदिरावरी घालती !
अजून देवाची शेज नव्हती रचिली,
साज तो तसाच होता सारा मूर्तीवरी !

दरवडेखोर आले सशस्त्र चालून—
पूजारी बापुडे भयें बैसले दडून !
काढून घ्यावया सावकाश अलंकार
मूर्तीच घेऊन झाले लुटारू पसार ! ३०
मुगुट तो गेला, देवमूर्ति तीही गेली !
—त्याचाच उडाला हाहाःकार हा मंदिरीं !

४

नगरीं या देवा ! आलें यात्रेला दुरून,
नाही दिनभरीं तुझें घडलें दर्शन !
यात्रिकांची कोण खेचाखेच मंदिरांत !
दुबळी मी, कैशी करूं प्रवेश दाटींत ?
गीतांनी तुजला पूजायाचा होता हेत,
—गलबल्यामधे परी कैसें गावें गीत ?
होऊन निराश परतलें नगरांत,
कंठिला दिवस नगरच पाहण्यांत ! ४०
पातलें भेटीची आस आता मी धरून
मध्य-निशा-काल शांत-निवांत बघून !
—" जाईन मंदिरीं सामसूम झाल्यावरी,
श्रीमुख गोजिरें न्याहाळीन डोळेभरी,
षोडशोपचारें देवपूजा मी बांधीन,
गीतांचीं सुमनें तयावरी उधळीन !
घालीन त्या मिठी, कंठ करीन मोकळा,
अश्रू हे साचले वाहवीन घळघळा !
प्रसन्न होईल भक्तसखा मजवरी,
पुशील आसवें नयनींचीं निज करीं ! ५०

देईल विश्वास, घट्ट उरीं कवळील,
गळ्यांतली माळ मज कौतुकें घालील ! ”
–ऐशा आशेने मी आलें धावत मंदिरीं,
केलीस ना देवा ! निराशाच माझी पुरी !

५

कोणाच्या दर्शनें आता निववावे डोळे ?
कोणाजवळी मी करूं हृदय मोकळें ?
तुवांच गीतांची दिली देणगी मजला :
गीतें तीं आळवूं तुजवीण कवणाला ?
तुझेच यात्रिक तुझी मूर्ती पळविती,
तुझ्या मंदिरांत तुलाच न राहूं देती ! ६०
धुंडाळावें तरी रूप तुझें कोठे कोठे ?
तुला शोधावया जाऊं कोणत्या मी वाटे ?
विफलच यात्रा तुझें होतां न दर्शन;
यात्रेचा हो मात्र मज भरपूर शीण !
तुज पळविती तयां लाभला किरीट !
निर्माल्यही तुझें माझ्या नाही ना दैवांत ?

१४. शीळ

छंद–उद्धव

दिवस मावळूं दे
विझूं दे निमिषांत
प्रकाश दिवसाचा
वाढत्या तिमिरांत ! १

दिवस मावळूं दे
येऊं दे काळरात
रतलें असतां मी
माळ ही गुंफण्यांत ! २

दिवस मावळूं दे
ठाकोनी पैलतीरीं
मजशीं घाल शीळ
वंशींच्या वायूपरी ३

दिवस मावळूं दे
साद ती कानीं येतां
राहील गुंफण्याचा
हार हा अपुरता ! ४

दिवस मावळूं दे
शीळेच्या धुंदिगुणें
धुंदींत तुजकडे
येईन धुंद मनें ! ५

दिवस मावळूं दे
नवखें पैलतीर
नवखा तसू-तसू
तेथला दूरवर ! ६

दिवस मावळूं दे
ठाऊक तूं कोठून ?
रम्य तूं की तूं उग्र ?
–हेंही रे ठाऊक न ! ७

दिवस मावळूं दे
शीळेच्या धुंदिगुणें
तरीही तुजकडे
येईन धुंद मनें ! ८

दिवस मावळूं दे
साद ती येतां कानीं
पुरती व्हावी माळ
कोठोनी ही गुंफोनी ? ९

१५. कंटकमाला

छंद–रक्षा

१

नांव तुझें ऐकोनिया दयाळा ! रंक मी
आलों तुझ्या धामीं.
दारीं दाटी याचकांची मिनली अपार
देणग्यांचा वर्षाव तूं करिशी त्यांवर
मुखीं त्यांच्या चाले तुझा जयजयकार
निनादे अंबर !
तुजपुढे मींही उभा राहिलों येऊन
करांतें जोडून !

२

मौक्तिकांचे हार तुवां दिधले कोणाला
कोणा रत्नमाला.

अभागी मी—आस त्यांची धरावी कोठून ?
दे कांहीही : देशील तें घेईन मानून !
नुसतेंच बोलशील मधुर वचन—
धाईल मन्मन !
तितुकेंही पुरे होई मज गरिबाला
जिणें कंठण्याला !

३

इतुक्यांत घातली तूं मज नवलाची
माळ कंटकांची !
वदशी : “ घे अजयाची ही काटेरी माला
तुझ्याजोगी जाणोनिया दिधली तुजला ! ”
“—वैजयंती लाभे यातें !—” कोणीसें बोलला,
उरीं घाव केला !
एकच तों चोहोकडे उठे हास्यध्वनी
गेलों बावरोनी !

४

हाच काय मधु बोल ?—हीच का देणगी
तुझी मजलागी ?
‘ विनोद ’ हा म्हणूं तरी मर्मच छेदत !
कीं कसोटी पाहण्याचा असे तव हेत ?
दीनास का लावितात कस अघटित ?
—झालों रे वंचित !—
वैजयंती मानावया कंटकमाला ही
धैर्य तरी देई !

१६. तुटणारा तारा

छंद—वंशमणि

१

निखळून गगनामधून
पडताहें वेगें कोसळून
　　कोणी तरी अदृश्यच कर
　　खाली खाली ओढी अनिवार !
दुबळा मी—रोधूं कैसा त्यातें ?
सोडवावें कैसें आपणातें ?
　　संकटीं या बाहूं कवणाला ?
　　शक्त तरी कोण तारण्याला ?

२

पहा माझे सवंगडी सारे
आकाशींचे ग्रह-गोल, तारे
　　प्रकाशाचा गोफ अंबरांत
　　अजूनहीं कैसे गुंफितात !
काय मीच अभागी एकला ?
मुकावें का मींच मत्पदाला ?
　　नभांतलें स्थान तें पहिलें
　　दुर्लभच काय आता झालें ?

३

क्षण क्षण पतनाची गती
वाढून मी चाललों खालती !

तमोमय पाताललोकांत
पडणार काय खितपत ?

तेज माझें विझून सकल
पाषाणाची कळा का येईल ?

किंवा, तनु जळूनी जाईल ?
मातीलाच माती की मिळेल ?

४

रे अदृश्य करा ! कोठे नेशी ?
दया लव नये का तुजशीं ?

नको, ऐसें नको लोटूं तमीं
खराच रे दीन अनाथ मी !

थरकाप होतसे जीवाचा
तोल पुरा सुटला देहाचा !

आळवणी किती करायची ?
आण तरी घालूं कवणाची ?

५

परी तुज कणवा ये कैचा ?
तंतु-तंतु तुटला आशेचा !

चंद्रपद नव्हतों मागत,
सूर्यपद नव्हतों वांछित;

माझें मज तारकपद तें
पुरेसेंच खरोखर होतें !

त्यासही मीं वंचित व्हावें ना ?
काय आता सर्वनाशाविना ?

१७. मिणमिण पणती

जाति–लीलारति

१

गे कले ! तुझा मी पूजक म्हणवी जनीं :
तुज जीवेंभावें सेवितोंहि निशिदिनीं;
वदुं केवि : जाहलों तुझा प्रीतिभाजन
जरि चुकुनी-मुकुनी लाभे तव वीक्षण ?
परि समाधान तें कसें मदंतरिं नसे !
—रे दिव्य जीवना ! तुझेंच जडलें पिसें !

गे कले ! मजशिं तूं सर्वस्वहि अर्पिलें,
नच उमलायाचे वृत्तींचे तरि कळे !
तूं मिळुनहि कोठुन मिळे दिव्य जीवन ?
त्यावाचुन कैसें निवे तप्त मन्मन ?
—रे दिव्य जीवना ! लाभशील केधवा ?

बघ ! तगमग तगमग अक्षय लागे जिवा !

२

रे दिव्य जीवना ! अभाव तव आगळा
लव भरुन निघाया उपासितों मी कला :
—नच विहरत असतां चंद्रकिरण अंबरीं
पथिं दिसावयाला पाउल पुढलें तरी—
हातांत घेतली पणती ही मिणमिण !
—गे कले ! क्षमा करि या उपमेकारण !

रे दिव्य जीवना ! तुझा एकही क्षण
मज पुरे व्हावया धन्य जगीं जन्मुन !

कासया कलेचे हवेत शत वत्सर ?
—कुरबान असति ते सकल त्या क्षणावर !
—गे कले ! जाशि का कोपुन हें ऐकुनी ?
रे दिव्य जीवना ! तूं तरि ये, ये क्षणीं !

१८. भुलवो जननयनांतें !

जाति—'रूपखनि'

भुलवो जननयनांतें
रूपखनी कामिनी;
—परि साधें वदन तुझें
टाकी मज मारुनी ! १

रमवाया मज कशास
ललित रागरागिणी ?
—शब्दांतच तव साध्या
गाण्याची मोहनी ! २

चंचलता नयनींची
विदित नसो नच जरी;
—साधें हें तव बघणें
वितरि सुधामाधुरी ! ३

व्यर्थच त्या सुममाला !
—तव करिंची त्यांहुनी
काडीही गवताची
मज सुगंधशालिनी ! ४

साध्या तव पणतीची
उडुलाहि न ये सरी;
सदनींचें—हृदिंचेंही—
तम सारें संहरी ! ५

१९. प्रेमाचा वाटा

जाति—चंद्रकला

१

सखये ! तूं असशी व्यापुनी माझ्या हृदयाला
त्यांत तसूभरही दुज्याला रीघ न राहुं दिला !
पहा ! दीन जन हे आर्तरव दुःखें करितात
उभें रहायाही स्थळ न त्यां कुठेच जगतांत !
दे थोडी जागा दे तयां उदार मन करुनी
येऊं दे करुणा तयांची विपन्नता बघुनी !

२

तुज कर्तव्याची अर्पितों नित्य सुमनमाला
कशी जरी असली प्रियच ती तुझिया चित्ताला !
सर्वच माळेचा परी तूं लोभ गडे न धरी
अनाथांस मिळुं दे तींतलें प्रसून एक तरी !
होतिल त्या वासें अल्प तरि तीव्र गंध कमती
जीवनांत त्यांच्या सदाचे जे भरून असती !

३

प्रेम-दीपकाचा माझिया प्रकाश तुज मिळतो
मोद मनांत तुझ्या म्हणोनी डुलतो—बागडतो !
त्या तेजामधला एक तरि आशामय किरण
सत्वर लाभूं दे प्रियतमे ! गरिबांलागून !
अंतरंगिं त्यांच्या दाटला निबिड अंधकार
तो तेणें कांहीं लोपुनी होईल विरलतर !

४

पंचप्राणांचा वाहिला ठेवा तव पायीं
स्वामिनीच त्यांची ! –तयांचें करि तूं कांहीही !
एखादाच परी त्यांतुनी बाजुस राहूं दे !
दीनांच्यासाठी तेवढा तरि मज वेचूं दे !
कणही सौख्याचा लाभला जरि त्यांतें तेणें
धन्य, धन्य होई खचित मग माझें तुच्छ जिणें !

२०. सारेंच गोड !

छंद–तुलसी

ऐकाया रात्रीं गोड
जेधवा रातकिडे
गातात चोहोकडे
जनीं–वनीं ! १

ऐकाया रात्रीं गोड
निनाद घंटिकांचा
गाईंचा-वासरांचा
गोठ्यामधें ! २

ऐकाया रात्रीं गोड
आवाज तान्हुल्याचा
झोपेंत हासण्याचा
पाळण्यांत ! ३

ऐकाया रात्रीं गोड
जेधवा परिचित
कंकणें वाजतात
शेजेपाशीं ! ४

२१. विश्वोत्पत्ति

[सप्तलोकांपलीकडील परमेश्वराचें निवासस्थान. कोटिसूर्यांसारखें तेज असलेला परमेश्वर विश्वनिर्मितीनंतर अमळ विश्रांति घेण्याच्या विचारांत आहे, एवढयांत त्याच्या रंजनासाठी चार वाणी मधुर स्वरांत गाऊं लागतात.]

वाणी १ ली :

छंद—विश्वजनक

दिव्य स्वरांनो ! दिव्य भावांनो ! व्हा रे सन्मुख :
आम्हांत मिळा रमवावया विश्वजनक !
दिव्य स्वरांनो ! आळवा तुम्ही गाण्याचे सूर,
दिव्य भावांनो ! वाहूं द्या त्यांत भक्तीचा पूर !

वाणी २ री :

छंद—गजवदन

दयाळा ! विश्वाची रचना पाहून ५
कल्पना स्फुरते यापरी नवीन :
संगीताची गोडी फार तुझ्या मना
म्हणून विश्वाची केली रुद्रवीणा—
ग्रहांचे जोडिले तुंबे परोपरी
कर्षणाच्या तारा लावियल्या वरी ! १०
ज्या करांगुलीला शोभे लख लख
चंद्रकोरीचें हें इवलेंसें नख—
तिनेच त्या तारा छेडिशी सतत,
नीरवतेची तूं वाजविशी गत !
अनंत ती वीणा ! अनंत ती गत १५
अनंततेमधे भरली अनंत !

वाणी ३ री :

छंद–वंशमणि, बदलून

निराकारा ! रमविशी मन
इच्छामात्रें साकार होऊन,
बोलून–हासून !
आकार तूं घेशी जसा–जसा, २०
निर्माण हो प्राणी तसा–तसा;
बोलतां तूं–भाषा निपजती,
हासतां तूं–कलांची उत्पत्ति
हो त्या त्या जगतीं !

. . .

मानवांचें रूपडें रेखीव २५
एकदा तूं घेशी अभिनव
–थक्क दैत्य–देव !–
अर्ध नर, अर्ध नारी त्यांत
–स्त्री–पुरुष–भेद तेणें होत !
त्यांतूनच अतिमानवाचा ३०
मर्त्यलोकीं विकास व्हायचा
–हेत हा मनींचा !

वाणी ४ थी :

छंद–विश्वजनक

दिव्य स्वरांनो ! दिव्य भावांनो ! पावा विराम :
विश्वजनक करूं पाहतो आता आराम !
तृण असूं द्या, असूं द्यात की उज्ज्वल तारे, ३५
प्रभूने जें जें सृजिलें तें तें दिव्यच सारें !

२२. अनलज्वाला

मुक्तछंद (मात्रिक)

स्वतंत्रते ! तूं मोहक !–दाहक–!
–मोहकता तव कुणा न मोही ?–
कोटि कोटि जन तुला विमोहुन
स्वतांस भुलले, पूजक बनले, पूजनिं रतले :

प्रेमाश्रूंनी तुला न्हाणिती, ५
भावसुमांनी तुजशिं नटविती,
नाचत गाती तव जयगीतीं–नभ निनादिती !

परि तव देवी ! दाहकताही कुणा न दाही ?
कोटि कोटि जन जे तुज भुलले–तुझेच झाले–
तुझ्या पूजनीं रंगुन गेले–भान विसरले– १०
त्यांसच ज्वाला तुझ्या वेढिती–लपेटताती–
जाळति–पोळति–राख बनविती !

अनलज्वाला दुरुनच मोहक–नयनाल्हादक–!
परंतु तिजला प्रेमोन्मादें कवळूं जातां
दग्ध करी ती !—नच तिला क्षिती !–कुठली खंती ? १५
स्वतंत्रते ! तव अशिच असे गत !

ज्वाला जाळो !–अथवा पोळो !–
तिज भुलल्याविण राहिल कोठुन शलभमालिका ?
तिच्यावरी ती झेपांवरती झेपा घेते !–
हासत हासत जळुनी जाते !–तन्मय होते ! २०

२३. कल्पनेंतला ताजमहाल

जाति—अचलगति

ताजमहाला ! तुजलागी
पाहिलें न मीं अजुन जरी;
तरिहि न आतुर मम नयनें,
हुरहुरही नच मदंतरीं !
" जगावेगळा अनुभव हा ! "
—म्हणशिल तूं मज उपहासें !
वद कांहीही !—सत्यच हें !
तुजशिं अन्यथा कथिन कसें ?
अवगणना तव करावया
परि तुज सांगत हें नाही :
अवमानाया सौंदर्या
धजतिल नच रे सुरवरही ! १

. . .

ताजमहाला ! तूं दिसशी
कल्पनेमधे नित्य मला :
कल्पनेंतलें दर्शन तें
वर्णवे न मम वैखरिला !
दिव्यत्वाची तयावरी
गूढ-रम्य छवि झळझळते;
—स्वप्नच सुंदर तद्रूपें
आकाराला की येतें !
मयसभाहि ती त्यापुढती
चूरच व्हावी लाजोनी;

ताजमहाला ! मग तुजला
तुळा तयाची ये कुठुनी ? २

• • •

कल्पनेमधें कुरूपता
सुंदरतेचें रूप धरी :
नवल कशाचें, सुंदरता
सुंदरतर हो तींत जरी !
मंद मंद ही दिसणारी
वास्तवांतली चिनगारी
कल्पनेमधें बने क्षणीं
चांदणीच चमचमणारी !
आणि, कल्पना लवलाही
वास्तवांतल्या तारेतें
चढवितसे झगमगणाऱ्या
चंद्रपदाच्या मुगुटातें ! ३

• • •

नसो नसे मीं देखियलें
ताजमहाला ! तुज अजुनी,
सांग तूंच परि सांग अता
खंत कासया करूं मनीं !
सौंदर्याचा तुराच तूं
यांत न शंका मला जरा;
कल्पनेंतली छबी तुझी
परंतु शतगुण चारुतरा !
प्रत्यक्षीं तुज पाहुनिया
तसाच व्हावा हर्ष कसा ?
कल्पनेंत मी म्हणुन तुला
स्मरुनी होतों खुळा-पिसा ! ४

२४. सोहाग-रात—ऐतिहासिक खंडकाव्य

जाति—अनलज्वाला

[**कथासूत्र**—गनोरच्या लावण्यवती गौरी राणीच्या अभिलाषेने पठाण सरदार दाऊदखान याने तिच्या पतीशीं—गनोराधिपतीशीं—दोस्तीचा बहाणा करून गडावर मुक्काम केला व कपटाने त्यास ठार मारिलें. पुढे खानाने राणीला मीलनाची निकड लाविली असतां तिने प्रथम त्याचा नाश करून नंतर त्याच्या सैनिकांकडून विटंबना न व्हावी, एतदर्थ, स्वतःचेंहि बलिदान केलें!]

१

गौरीलागी दाउद पाठवि पत्र यापरी :
" तुझ्याचखातर दिधल्या ढाला गनोरावरी !
ऐकत होतों तव रूपाची नित्य अवाई
मन्मथ माझ्या हृदिं पाऱ्यापरि डोलत राही !
गड सर केला ठार मारुनी तव पति काफिर,
झालों आहें आलिंगाया तुजला आतुर !
गनोर हो मम, तूंही तेंविच हो जन्मवरी :
सोहाग अजी रात उभयतां करूं साजरी ! "
कळवी राणी, " दुर्ग जेधवा जिंकियला मम
तेव्हाच पदीं वाहियलें मीं प्रीतीचें सुम ! १०
पाठवीतसें मीलनसूचक पोशाखातें :
लेवुनिया तो यावें रात्रीं प्रासादातें ! "

२

संध्येची मधु लाली लागे तमिं मिसळाया,
घडिभर रांगे विश्वावरती पिंगट छाया :
अवकाशाच्या बिळाभीतरी रजनी सर्पिण

धूसर धूसर कातच, वाटे, देई टाकुन !
निज दलबादल डेऱ्यामाजी दाउद हर्षुन
करि गौरीचीं बहुमोलाचीं वस्त्रें धारण :
थाटच न्यारा देहावरल्या अंगरख्याचा
कटिस चोळणा, विळखाच जसा 'त्या' बाहूंचा ! २०
विलसे त्याच्या शिरीं भरजरी टोप तुऱ्याचा,
करकरणारा चढाव पायीं वेलबुटीचा !
सुरमा रेखी नयनिं सळइने कोरुन कोरुन,
तांबुस दाढी दुभंग अपुली करी विंचरुन !
स्वतालाच तो भुले दर्पणीं बघुन छबीशीं :
कंठा मिळवी आयन्यास जी दावी दासी !
म्हणे मनाशीं, "पोशाखच जर इतुका सुंदर,
असेल तर ती धनीण त्याची किती चारुतर ?"

३

शिंगें-कर्णे दाऊदाच्या तंबूपुढती
नगाऱ्यांचिया ध्वनींत अपुला ध्वनी मिळविती. ३०
मशालवाले उभे त्या स्थळीं हारोहारी :
तिमिर तेथुनी पळुन बैसला जाउनी दुरी !
सेवक होता एक धरुनिया वारू अबलख
भरगच्चीचा जीन ज्यावरी शोभे लखलख.
नटुनी थटुनी दाउद आला डेऱ्यामधुनी
जयजयकारें सर्वेचि गेलें अंबर भरुनी !
ठेवि जेधवा पद तुरगाच्या रिकिबीवरती,
एकसरें तों बंदुकींचिया फैरी झडती !
टाच मारितां ठुमकत ठुमकत अश्व निघाला,
प्रासादाच्या द्वारापाशीं क्षणीं ठेपला ! ४०

४

विलास नांदे मूर्त महालीं सौधावरती
ठायीं ठायीं सौरभशाली दीप तेवती.
अंथरले लव-दार गालिचे तेथ मुलायम,
उंच आसनें दोन मांडिलीं वरति मनोरम--
एकातें करि सनाथ दाउद यवन-वीर-वर,
लावण्यखनी मनोरमहिषी बसे दुज्यावर.
शहामृगाच्या कोशासम तनु निस्तुल गोरी,
केश सुगंधित काळ काळे जशि कस्तूरी !
चुनडि केशरी खुले, केशरी तशीच चोळी,
—यज्ञवेदितें अनलज्वाला की लपेटली ! ५०
वरचेवर तिज दाउद निरखी तृषित लोचनीं
"हूरच भूवरि येइ !"—वदतसे चकित होउनी ! :
करूं लागल्या रम्य नर्तकी गायन-नर्तन
सारंगीच्या सुरांत अपुला सूर मेळवुन.
धिकि धिकि शब्दें मृदंग धरितो ताल सारखा,
ठेक्यावरती पाय तयांचा पडे नेटका.
मणिमय वेणी जल-लहरि-परिस नाच-नाचते
पाठिस लागे जणूं त्यांचिया मोहुन त्यांतें !
"वा ! वा ! खाशी !—" बोले दाउद मान डोलवुन
एक रमणि त्या मद्यें पेला देइ भरभरुन. ६०
संगीतापरि भरास आलें मदिरा-सेवन,
रंगु लागला अनंग त्याच्या अंगांगांतुन !

५

म्हणे, "जिवलगे ! वेळ वाउगा का घालविशी ?
अधीरतेची माझ्या नच का पर्वा तुजशीं ?
तव सौंदर्यें केलें आहे वेडें पुरतें :

उपचार दुजे कशास हे मज भुलवायातें ?
एकेक तुझा बोल लाजविल मंजु गायना–
ऐकवूनिया सार्थ माझिया करी जीवना !
अधररसाची शराबासही सर ये कैशी ?–
चाखवून तो तुच्छ गणूं दे स्वर्गसुखांशीं ! ७०
विलंब का मग ?–चल लवलाही शयनमंदिरीं ! "
–नर्तकींप्रती तिथून जाया खुणावी करीं !

पटपट बदलति भाव गौरिच्या वदनावरचे
–रंग बदलती जैसे स्वाती-नक्षत्रींचे !
आणि, तन्मुखीं झुंज चालली अटीतटीची
बळेंच आल्या स्मितासंगती संतापाची !
हार जयश्री घाली शेखीं स्मितालागुनी
कोयळापरी बोले गौरी मंजुळ वाणी :
" आपुलीच मी झाल्यें आहें दासी आता,
हसें करुन का घेतां दावुन मदनविवशता ? ८०
आणियल्या मीं नाचणारिणी निवडुन–वेचुन,
कसब आणखी थोडें त्यांचें घ्यावें पाहुन !
शृंगाररसा उरली आहे अमुप शर्वरी ! "
–ऐसें वदुनी आसनावरुन उठली गौरी :
लाजत–मुरकत दाउदाजवळ हळूच जाई,
स्वता तयाचा पेला मद्यें भरुनी देई !

पुन्हा नर्तकी घेउं लागल्या तान सुधोपम,
चाल चरणिंचे वाजती पुन्हा रुमझुम–रुमझुम !

६

तोंच कोसळे दाउद : विटपच जणु उन्मळला :
गडबड–गडबड भुइवर लागे लोळायाला ! ९०

" का हो अवचित सर्वांगाची लाही लाही ?
व्याकुळ होउन जीव का असा जाऊं पाही ?
जादूटोणा काय मजवरी केला कोणी ?
दगा करी की राणी ? "—कष्टें म्हणे कण्होनी !
वादन कैचें ?—गान कोठचें ?—नाचहि कुठला ?
विलीन झाली नीरवतेमधि संगीतकला !
गौरीची लव तुरे मघाची हास्य-माधुरी,
लोल विजेचे उठति तियेच्या लोचनांतरीं !
उपसुन हातीं घेइ दडविल्या खंजीरातें :
अनुसरताती चतुर नर्तकी निज महिषीतें ! १००
फुलमाळेसम कोमल अवघ्या प्रथम भासल्या,
—त्याच कामिनी बनति नागिणी क्षणीं खवळल्या !

कडकडली मग गौरी, " नीचा ! घे ऐकोनी !
मरणघडी तव खचित ठेपली जवळ येउनी !
पोशाख असे तुझा माखिला तीव्र विषाने
तें तव देहीं भिनुनी जावें पूर्णपणाने—
म्हणुनी आम्ही नर्तनादिकीं समय दवडिला
—दैवदयेने हेत आमुचा सफल जाहला !
तेणें तुझिया अंगीं वणवा असे पेटला
—दीपराग हा तुझ्या विनाशें तुला गाइला ! ११०
सोहाग अशी रात अलौकिक अजुन साजिरी
नसेल झाली कधिच कुणाची मेदिनीवरी ! "

लोळत-विव्हळत बोले दाउद, " पापरूपिणी !
पठाण माझे घेतिल याचा सूड उगवुनी !
पहा ! येथुनहि दिसेल तुजला शिबीर माझें
झगमगताहे रोषणाइने मीलनार्थ जें;

सैनिक तेथे रंगीं असती दंग होउनी
झालिस माझी बटीक ऐसें मनीं भावुनी !
परंतु केला घात यापरी तूं कपटानें !
समजतांच हें, न्हातिल तुझिया ते रुधिरानें !" १२०

गौरी गर्जे पुन्हा, " यापुढे सूड कोठला ?
दारूने मम महाल सारा आहे भरला !
उडेल भडका पळांत तिजवरि ठिणगी पडुनी :
प्रासादासह जाऊं आम्ही राखड बनुनी !
जोहाराने क्षत्रियकन्या वरिति मरणगति :
पतिलोकातें पावुन धन्या होती अंतीं !
सूडाची मग उगिच जल्पना करिशि कशाला ?
मींच मात्र रे अपुल्या पतिचा सूड उगविला ! "

" घे ! घे ! "–म्हणुनी गौरीलागी मारायाला
दाउद् उठला, परि कोसळला तोंच धरेला ! १३०
डोळ्यांपुढती एकसारखी ये अंधारी
" क..प..टी..के..व..ळ..! "–तुटक तुटक तो वदे वैखरी !
चिडुनी बोले, " मलाच कपटी कशास म्हणशी ?
मुगुटमणी तूं कपटपटूंचा काय न असशी ?
चिरकाल तुवां आसक्ती मम काय न धरिली ?
पतिशीं माझ्या वरवर मैत्री काय न केली ?
अतिथी म्हणुनी आलास न का गनोरावरी ?
हरिलें नच का तत्प्राणधना तुवां तस्करीं ?
काय न येशी इथे तूं मला भ्रष्टविण्याला ?
–त्वत्कपटांची दीर्घतरा ही काय न माला ? १४०
का न योजना करूं कपटाची तव कपटावर ? "
–वदतां वदतां कोप तियेचा होइ अनावर !

निमिषोन्मेषीं दाउदावरी चालुन गेली–
उरीं तयाच्या चकचकणारी कट्यार घाली !
नर्तकीहि निज खंजीरांची तृषा शमविती :
विझुनी गेली दाऊदाची प्राणज्योती !
" चला, पेटघूं दारू ! "–म्हणतां गौरी राणी
गर्जत ' हरहर ! '—जाती अवघ्या सौधावरुनी !
भीषण झाला स्फोट : उठावें प्रेतहि दचकुन :
दाखवीतसे विराट अपुलें रूप हुताशन ! १५०
जिभा तयाच्या भिडूं लागल्या नभोमंडला,
" सूड ! सूड ! "—ये शब्द त्यांतुनहि ऐकायाला ! !

२५. पऱ्यांचें गाणें

जाति–भरतखंड

पसरतां भुवनिं यामिनी
अम्हि नंदनवन सोडुनी
कर करांमधे गुंफुन
हिंडतों जनवनांतुन !
पथिं इवले इवले दिवे
जन म्हणति तयां काजवे !
–ही अजाणता पाहुनी
गुदगुल्याच होती मनीं !
किति बाई ! मानव खुळे !
त्यां इतुकेंही नाकळे ! १

. . .

अमुच्या घन अलकांतिल
किति उन्मादक परिमल !
झड गंधवाह घालुन
दिशिं दिशिं तो ने वाहुन !

—परि गमे जनांलागुन
फुलवाडी ये बहरुन :
एकेक तींतलें सुम
विखरितें गंध घमघम !

किति बाई ! मानव खुळे !
त्यां इतुकेंही नाकळे ! २

. . .

हा इथे दंग वादनीं
तो तिथे गुंग गायनीं :
स्वनिं उभय आपुले स्वन
ओतितों तयां नेणुन !

—म्हणुनीच मधुरता खुले !
—हें जनां कळे कोठलें ?
ते वानिति त्यांसच परी !
कुठवरी हसावें तरी ?

किति बाई ! मानव खुळे !
त्यां इतुकेंही नाकळे ! ३

. . .

झोपल्या मानवांचिया
शेजेशीं जावोनिया
प्रीतिचा मंत्र मोहन
पुटपुटतों कानांतुन !

मग गोड गोड कांहिसें
झोपेंत त्यांजला दिसे :
ते 'स्वप्न' तया बोलती
—मूढतेस नाही मिती !

किति बाई ! मानव खुळे !
त्यां इतुकेंही नाकळे ! ४

२६. गवती फूल

छंद—शुद्धसती

गवताचें फूल
वात देई डोल
—चित्तही विलोल ! १

कैसें तया वर्णूं ?
किती साधें म्हणूं ?
—साधा अणुअणु ! २

कैसें जन्मा येतें-
—कैसें उमलतें—
न कळे मतीतें ! ३

जरी कळों येई,
विश्वाचें गूढही
'गूढ' नच राही ! ४

जी शक्ती विश्वास
आणी आकारास,
तीच या फुलास ! ५

२७. देवमान्य–बौद्धकालांत कल्पिलेली कथा

छंद–गजवदन

१

यज्ञ शंभरावा होतांच पुरता
गमे भूपा झाली जन्मसफलता !
कुणा दे दक्षिणा, कुणा देई भूमी,
याचकां संतुष्ट करी अंतर्यामीं !
घडविली तेणें यज्ञपुरुषाची—
कलाकुसरीची प्रतिमा सोन्याची :
" मिरवून मूर्ति नगरामधून
वैभव आपुलें सकलां दावून,
शंभर यज्ञांचें स्मारक म्हणून
होत्यालागून ती करावी अर्पण; १०
–प्रथा अभिनव होईल ही खास,
नांवलौकिकही येईल भरास ! "
–यापरी योजिला भूपाने विचार
डामडौलाची त्या हौस अनिवार !
त्याच मूर्तीची ही पालखी निघाली–
नगरांत तीच धांदल सगळी !

२

पहा ! उभारिलीं पताका-तोरणें
मार्ग संमार्जिले जान्हवीजलाने;
यज्ञनारायण शोभे पालखींत,
सामगायनातें ब्राह्मण गातात. २०

पादचारी भूप चवरें वारितो,
मंजुळ मंजुळ चौघडा झडतो.
दो बाजूंस पथीं सैनिक चालती,
पालखीशीं कोणा रिघों नच देती !
दर्शनार्थ जन लोटले अमित :
दुरूनच देवा भावें नमितात !
" धन्य नृपवर ! "— करिती ते ध्वनी
–हरिखून तेणें भूप म्हणे मनीं :
" मजसम कोण भुवनीं दुसरा ?
पुण्यश्लोकांत मी पुण्यश्लोक खरा ! ३०
अमर सुमनें का न उधळिती ?
काय कल्पतरु सुकला संप्रती ?
नुधळोत सुखें नुधळिती जरी,
ठसलों जनांच्या हृदयाभीतरी ! "

२

इतुक्यांत एक कुष्ठें पीडिलेला
पालखीजवळी जावया सजला !
" पैस रे द्या वाट ! अडवा न कुणी !
टेकवूं द्या माथा प्रभूच्या चरणीं !
स्पर्शें त्याच्या भोग हरतील सारे ! "
–ऐसें वदून तो पुढे–पुढे सरे ! ४०
–कोण हें साहस !– भूप खवळला !
" मारा पातक्यातें ! "– सैनिकां बोलला !
तळपूं लागल्या नग्न तरवारी,
श्रमण ये कुणी तोंच तीरापरी,
गलितांगालागी झाकी निज देहें–
हासत हासत घाव साहताहे !

क्षणीं होतीं त्याचीं खांडोळीं–खांडोळीं
–सुरीं नभांतून सुमवृष्टि केली !
कोठला तो कुष्ठी ? यज्ञनारायण
स्वयं प्रगटला त्याच्या देहांतून ! ५०
म्हणे, " राया ! भूल पडली तुजला :
यज्ञांत–मूर्तींत– असेन कोठला ?
रंजल्या–गांजल्या दीनांचें शरीर
आम्हां देवतांचें हेंच रे मंदिर !
मीच झालों कुष्ठी सत्त्व पाहण्याला–
भिक्षूवीण नये कुणीच कसाला !
पहा ! कैसा मान्य हो देवांलागून–
स्वर्गांतून तया येतसे विमान ! "
–आलें यान तदा वेगें धरेवरी :
श्रमण जाहला दिव्यदेहधारी, ६०
यज्ञनारायणा करून वंदन
बैसतां विमानीं, तें गेलें उडून !
–पुष्पवृष्टि पुनः करी सुरगण
पावे अंतर्धान यज्ञनारायण !

२८. पऱ्यांची नगरी

मुक्तछंद (मात्रिक)

बालक : पथा ! पऱ्यांच्या नगरीला कधि नेशि मला ?
कथा ऐकिल्या त्या नगरीच्या नवलपरीच्या :
म्हणती तेथे नच ये कानीं दुजा ध्वनी–
मधु हास्याविण, मधु गीताविण पऱ्यांचिया.

झळझळ झळझळ झळके नगरी कौमुदीहुनी अद्‌भुत छविने ! ५
—जवळच तेथुन वसे स्वर्ग तो—नंदनही तें—
—नंदनांतल्या दिव्यौषधिंची द्युति ती—कृति ती !
जरा न तेथें, मरणहि नाही, दुःखाचें मग नाव कशाला !
अक्षय यौवन, अक्षय मोदहि तिथे नांदतो !
परंतु जातां प्रौढ कुणि तिथे नगरी विरते— १०
—पऱ्या लोपती !—हास्य संपतें !—गायन थिजतें !
तथापि तेथे बाळें जातां दृष्ट न त्यांची नगरिस लागे :
गुप्त न होई, लया न जाई !
—ऐशा मौजा नित्य ऐकतों ऐकुन डुलतों—
म्हणुनी आतुर जाण्याला त्या नगरीला १५
ने, ने तेथे ने मजला.

मार्ग : छे, छे, कैसें त्या नगरीला नेउं तुला !
पिंडच माझा स्थूलाचा—नच सूक्ष्माचा !—
सूक्ष्माला तुज न्यायाला मी क्षम कुठला ?
इहलोकांतिल कुण्या नगरिला, वा हाटाला, वा सदनाला २०
नेण्याला मी सज्ज सदा !
परंतु जाणें असे पऱ्यांच्या नगरीला जर
अक्षय यौवन मिळवायाला—
हास्यीं, गानीं गुंगायाला—
आनंदाला लुटावयाला— २५
जरा, मरण हीं चुकवायाला—
तर का येशी व्यर्थ मजकडे सत्त्वच माझें हरावयाला !
जड जगतांतिल मी जड वीथी—
आस धरिशि तूं जोंवर माझी—रे जडतेची—
विसर ‘ पऱ्यांची नगरी ’ तोंवर ! ३०

२९. नंदनवन मुकल्यावर–!

छंद–लवंगलता

[स्वर्ग व पृथ्वी यांजमधील रस्ता. चहूकडे घोर अंधार पसरला आहे. नंदनवनांतून हाकून दिलेलें ॲडम व ईव्ह हें पहिलें मानवदांपत्य त्या रस्त्यावरून पृथ्वीवर चाललें आहे. नंदनवनांत रात्र नसल्यामुळे पूर्वी कधीहि त्यांच्या अवलोकनांत अंधार आला नव्हता. यामुळे त्याच्या त्या विराट् प्रथम दर्शनाने तीं उभयतः अतिशय भयविव्हल झालीं आहेत !]

ईव्ह (थकलेसें करून) :

तम केव्हा सरे ?

ॲडॅम (निःश्वास सोडून) :

–हाय ! केव्हा तें सरेल !

धडधडे ऊर, वाटे, आताच फुटेल !

झाक मुख केशीं, मीही झाकीं एका हातें :

[ईव्ह घनदाट मोकळ्या केसांनी व ॲडॅम उजव्या हाताने तोंड झाकतो.]

–तमोभय हो कमती मिटतां नेत्रांतें !

राहूं दे हा दुजा कर कटीस गुंफून– ५

[ॲडॅम डाव्या हाताचा ईव्हच्या कमरेभोंवतीं विळखा घालतो.]

ईव्ह (स्फुंदत) :

अंतच न देवा ! का रे तिमिरालागून ?

. . .

ईव्ह (थरथरत) :

तम केव्हा सरे ?

ॲडॅम (निःश्वास सोडून) :

–हाय ! केव्हा तें सरेल !

सेवियेलें नेणूनिया ज्ञान-तरु-फल :

लोटून तूं देशी विभो ! नंदनामधून !

–तिमिरांत गवसलों ! –वाटही नवीन !– १०

ईव्ह (थकलेसें करून) :

–शीग तरी किती देहीं चालून चालून !–

ॲडॅम (सद्गदित कंठाने)

अंतच न देवा ! का रे तिमिरालागून ?

. . .

ईव्ह (थरथरत) :

तम केव्हा सरे ?

ॲडॅम (निःश्वास सोडून)

–हाय ! केव्हां तें सरेल ?

केवें पुन्हा तेजोमय नंदन दिसेल ?

ईव्ह (आशाळभूतपणाने) :

त्यावाचून सर्वत्र का तम नित्य राही ? १५

–जातसों ज्या मेदिनीतें असे का तेथेही ?–

ॲडॅम (निराशेने) :

धाडिता का प्रभु तेथ आपणां त्यावीण ?

ईव्ह (स्फुंदत) :

अंतच न देवा ! का रे तिमिरालागून ?

. . .

ईव्ह (थरथरत) :

तम केव्हा सरे !

ॲडॅम (निःश्वास सोडून) :

–हाय ? केव्हा तें सरेल ?

ईव्ह (कानोसा घेऊन) :

दुरून ये कशाची ही कानीं किलबिल ? २०

–नवेंच हें दयामया ! साकडें कसलें ?

ॲडॅम (उसनें अवसान आणून) :

पाहूं का मी उघडून नयन आपुले ?

ईव्ह (अधीरतेने) :

– छे, छे, नको राजसा ! रे जाशील भिऊन ! –

ॲडॅम (सद्‌गदित कंठाने) :

अंतच न देवा ! का रे तिमिरालागून ?

. . .

ईव्ह (थरथरत) :

तम केव्हा सरे ?

ॲडॅम (निःश्वास सोडून) :

–हाय ! केव्हा तें सरेल ? २५

ईव्ह (जास्तच भिऊन) :

किलबिल ये जवळ ! ...काय हें असेल ?

ॲडॅम (कष्टाने धीर धरून) :

बघतोंच –

[पाहतो तों, सकाळ झालेली दिसते. हर्षातिरेकाने तो ईव्हला घट्ट आलिंगन देतो !]

अहा ! फुटे तेज ! ...खग गाती !...

मही का ही ?...तमच न तेथ !...

ईव्ह (डोळे उघडून आनंदाने) :

–सरे अंतीं ! –

[पण हा आनंदाचा झटका लगेच ओसरून ती पुन्हा खिन्न होते !]

परी त्याची स्मृति सख्या ! राहील मनांत

तेजाहूनही अधिक ! –

ॲडॅम :

[ईव्हच्या भाषणाने नुकत्याच पाहिलेल्या अंधाराची दुःखद आठवण जागृत होऊन ॲडॅमहि तिच्यासारखाच पुन्हा खिन्न होतो !]

तीच मम गत ! ३०

. . .

विरामक (Epilogue)

तेजांतील ईश्वराचा अंश :

[अॅडॅम व ईव्ह यांची तिमिरच जास्त आठविण्याची प्रवृत्ति पाहून पृथ्वीवर प्रगट झालेल्या दिवसाच्या तेजांतील ईश्वराचा अंश सखेदाश्चर्याने स्वगत बोलतो.]

...होऊं नये तें जाहलें !–

तिमिरांतील सॅटनचा अंश :

[तेज प्रगट झाल्यामुळे पृथ्वीवरून पळून गेलेल्या, पण दिवसाची मुदत सरतांच रात्रीच्या वेळीं पुन्हा आपलें साम्राज्य पृथ्वीवर प्रस्थापित करण्याची संधि साधण्यासाठी तेजाच्या पाठीशींच अनन्त अवकाशामध्ये दडून बसलेल्या तिमिरांतील सॅटनचा अंश तेजांतील ईश्वरी अंशाला ऐकूं न जाईल अशा रीतीने त्याच्या दर वाक्यागणिक प्रत्युत्तरात्मक असें भाषण करतो.]

(– व्हावें तेंच झालें –!)

तेजांतील ईश्वराचा अंश :

मानवांतें तेज जरी दिसूनिया आलें,
तेजोधिक तमच त्यां आठवे तरीही !

तिमिरांतील सॅटनचा अंश :

(– निकेंच हें !)

तेजांतील ईश्वराचा अंश :

– झटेन मी लोपाया वृत्ती ही !

तिमिरांतील सॅटनचा अंश :

(मीही न का झटेन ती कराया अक्षय ?) ३५

. . .

(– समरभू हो इथून मानव-हृदय !)

३०. प्रतिध्वनि

जाति–भृंग

१

या दरींत
　　त्या दरींत
किति नीरव
　　होई तव
पडसादा ! ५
　　वास सदा !

हो जेव्हा
　　रव केव्हा
वाऱ्याचा
　　पक्ष्याचा, १०
हाकेचा,
　　पाण्याचा,
–खडबडुनी
　　दचकोनी
तूं उठशी, १५
　　बावरशी
तेच बोल
　　सुटुन तोल
घोळतोस,
　　घोकतोस ! २०

फिरुन फिरुन
　　ते ऐकुन
ध्यावे कुणि
　　हृदिं ठसवुनि–

अनुकारुन २५
    प्रिय–जन–मन
खुलवावें,
    डुलवावें !

    २

हृत्कुहरीं
    याचपरी ३०
तव नीरव
    करि अभिनव
पडसादा !
    वास सदा !

चुकुनमुकुन ३५
    भाग्य फळुन
त्रिभुवनांत
    फिरत फिरत
हृत्कुहरीं
    माझ्या जरि ४०
सुंदरता
    अमरनुता
क्षण आली,
    क्षण ठेली,
कुजबुजली ४५
    मंत्रावलि
–तरि जागृत
    हो क्षणांत !
घोक–घोल
    तेच बोल ! ५०

फिरुन फिरून
ते परिसुन
मनिं ठसविन,
कवनिं कथिन :
रसिकार्चन ५५
मग साधिन !

३१. दोन सुवास

जाति–पादाकुलक

तूं मी मिळुनी जाऊं विजनीं
राहूं तेथे जगा विसरुनी ! १

जादुगारिणी वनदेवि कुणी
असेल रानीं निवास करुनी. २

तिजला ध्याऊं तिजला गाऊं–
हवेत ते वर मागुन घेऊं. ३

प्रसन्न होइल वांछा पुरविल :
तुला–मला ती सुवास बनविल ! ४

कंटक कुठले मग जगांतले ?
कोमल कोमल शेज सुमदळें ! ५

या भ्रमराला त्या भ्रमराला
मधुची वार्ता कळवायाला– ६

दोघे मिळुनी फिरूं जनिं–वनीं
प्रभंजनाच्या पंखांवरुनी ! ७

फिरतां फिरतां मीलन घडतां
खरोखरीची एकरूपता ! ८

गंध मिसळले एक जाहले
अलग पुनरपी होतिल कुठले ? ९

जड देहाची अशी कोठची
परस्पर मिठी पडावयाची ? १०

३२. मनीषा

जाति—पादाकुलक

सागरांतलें पाणी तोडित,
कर्कश कर्णे फुंकित फुंकित—
साम्राज्यास्तव बलहतांवरी
बलोद्धतांच्या निघति रणतरी ! १

वाटे मजला : सागर व्हावें,
तरींस थोडें वाहुन न्यावें—
विशाल जबडा अवचित पसरुन
उदरीं त्यांतें घ्यावें लोटुन ! २

• • •

विमानेंहि नभिं मंडळ घेतीं :
एक, दोन -छे ! व्यर्थच गणती !
रणतरींहुनी ये दुबळ्यांवर
हें 'अस्मानी' संकट गुरुतर ! ३

वाटे मजला : अंबुद होउन,
करीं विजेचा आसुड घेउन—
एकामागुन एक विमानें
विलया न्यावीं झडपुन तेणें ! ४

३३. बुद्धाच्या अस्थींस-!

छंद—चातुरी

१

स्तूप येथे दिसतो डोळां
बौद्धाचिया युगामधला -
स्तंभ किती भव्य हा असे !
- खोदकाम लाविते पिसें !
" धन्य, धन्य कलाचातुरी ! "
- मुखांतून निघे वैखरी !

२

स्तूपातळीं खोल भूमींत
सुवर्णाच्या रम्य पात्रांत
बुद्धाचिया अस्थी पावन
असतील दिल्या ठेवून,
स्तूपमूल भक्त म्हणून
पूजितात फुलें वाहून.

३

अस्थींनो ! त्या अवताराचा
अंश तुम्ही आहां चिदाचा !
केवि मग न आकळत
विश्वशांति आली भंगत ?
चेव आणा खडबडून,
प्रगटूं द्या बुद्धालागून !

४

घुमवून शांतीची वेणु
विमोहील तो अणुरेणु !
दिव्य सूर कानीं येऊन
लोभादिक धरेवरून –
पळतील दुरीच्या दुरी :
मंत्रयोगें भुतें ज्यापरी !

३४. पाखरू उडालें !

जाति–हरिभगिनी

का उडुन पाखरू हें गेलें ? ध्रु०

अज्ञातांतुन–अंधारांतुन–काय निमंत्रण त्या आलें ? १
गंधर्वांचे रव गाण्याचे कानांवरती का पडले ? २
सूर्यफुलाच्या, चंद्रफुलाच्या सुगंधास का तें भुललें ? ३
काय येथल्या खोप्यामधलें कोमल तनुला तृण खुपलें ? ४
काय येथलें दाणापाणी सेवुन सेवुन मन विटलें ? ५
नंदनवनिंच्या दिव्य सुखांस्तव आतुर इतुकें का झालें ? ६
येइल परतुन आता कोठुन कितिही अश्रू जरि गळले ? ७

३५. दिव्य भवितव्य

मुक्तछंद (छांदस)

सूक्ष्म हवेहून, दीप्त तेजाहून,
चित्सरिता वाहे अथांग, उद्दाम !

कोठून ती कोठे फेसाळत जाते—कळे कवणातें ?
— तिचें तिजलाही कळून न येई !

सरिता वाहते अनंततेमधे अनंत होऊन : ५
मानव तियेंत भोवंडे घेतात—तडफडतात—!
चंद्रसूर्यादिक विशाल, विलोल गगनींचे गोल
भिरभिरतात—गरगरतात—प्रवाहाभीतरी !
उतरसे काय सर्व विश्वांतरीं अणु एक तरी सरितेबाहेरी ?

सरितेचें ऐसें रूप भव्य, दिव्य १०
मानवा ! करी का तुज भयाकुल—विस्मयविव्हल ?
नको, सरितेचें नको आराधन —
नको प्रवाहांत पुष्पसमर्पण—दीपविसर्जन—!
चिन्मय असून ती प्रज्ञाविहीन-ती संज्ञाविहीन—!
भरली तियेंत सारीच ‘ नेणीव ’ !—कोठली जाणीव ? १५
करुणा भाकून कणव येई न,
—अवमानूनही क्षुब्ध नच होई !
—कशाला स्फुंदणें ?—कशाला क्रंदणें ?

आहे घडायची त्वत्करीं प्रज्ञेची नौका नवलाची :
डोलकाठी उंच भेदून जाईल गगनमंडळ ! २०
मदभरें नौका डोलत चालतां—चालत डोलतां
क्षण शशांकाला क्षण रोहिणीला तिची डोलकाठी
स्पर्शितां उठेल मग परस्पर शशांकचुंबन रोहिणीच्या ओठीं !
—ऐशा नौकेलागी सरितेचें पडे कशाचें साकडें ?
सरितेवरती मात केल्यावीण ती राही कोठून ? २५
का तूंही तियेंत तडफडशील—धडपडशील ?

— आहे तुझें दिव्य ऐसें भवितव्य !

३६. स्वप्नमंदिर

छंद–निर्झरगीत

देवदूत : पहा! अद्भुत कवे! मंदिर
सुंदर किती!

कवि : –सुंदर फार!–
आकार छान रचना छान,
कारागिरीने हरतें भान!
हिंदु मंदिर, बौद्ध मंदिर,
पैगंबरी वा ख्रिस्ती मंदिर,
–यांत रचना विशेष जी जी,
ती ती आणिली मंदिरामाजी!
सर्व धर्मांच्या अनुयायांना
वाटावा त्यांत आपलेपणा! १०

देवदूत : कवीच खरा!– पुरे वर्णन!
आतलें कधी घेशी बघून?
अद्‌भुततर सारें आतील!
निववी नेत्र!

कवि : – कोण नवल!–
गाभाऱ्यामधें धवधवीत
सुवर्णासन रत्नजडित,
छत्र सोन्याचें वरी शोभतें
हिऱ्यामोत्यांची झालर त्यातें!
–विचित्र किती!–आसनावरी
फावडें, विळा प्रतिमांपरी!
हेंच का देव नव मंदिरीं? २०

पूजनीय का ते खरोखरी ?
त्यांसच काय वंदावें जनीं ?
भूषवावें का त्यांस सुमनीं ?
नकळे कांही ! मन बावरे !
असेल यांत दूता ! काय रे ?
देवदूत : नव युगाची नव तेजाची
पहाट आता फुटावयाची !
नवयुगाचें नवीन वारें,
नवयुगाचे नवे पसारे ! ३०
नवयुगाचे नवीन देव,
जुनाच जरी भक्तीचा भाव !
'श्रमलक्ष्मी' ही देवी उद्याची
फावडें, विळा प्रतीकें तिचीं !
परिस कवे ! परिस कानीं
गंभीर होई आकाशवाणी :
"या रे या सारे नव मंदिरीं
वसें मी नव्या मूर्तींमाझारी !
विश्वधर्माचें मंदिर धाम
विश्वशांतीचा तेंच उगम !" ४०

वृत्त—अनुष्टुभ्

जाग आणी नभोवाणी : स्वप्नजाल तदा विरे :
देवदूत कुठे ?—कोठे दिव्य मंदिर तें बरें ?
अर्थ कांही असे स्वप्नीं ?—की तें आहे निरर्थक ?
असो कांही ! स्मरे चित्तीं नित्य हें स्वप्नकौतुक !

* * *

शुद्धिपत्र

[किरकोळ मुद्रणदोष सहज लक्ष्यांत येणारे असल्यामुळें ते दुरुस्त केले नाहींत.]

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१६	६	महादेबी	महादेवी
२०	५	पातिव्रत्याची	पातिव्रत्याच्री
५१	१८	होईल	होइल